

वर्ष १ ले अंक १ ला

# स्मृती

## दिपावली विशेषांक २०२०

किंमत: ₹ १००/-

# दोन शब्द आभाराचे



गीतांजली भोसले
'स्मृती' दिवाळी विशेषांक
संपादिका

नमस्कार,

स्मृती दिवाळी अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. खूप वर्षांनी मी पाहिलेलं स्वप्न सत्यात उतरत आहे. सोशल मेडीयाच्या जमान्यात बघितलेलं स्वप्न जरी जुनं असलं तरी ताज्या टवटवीत फुलांसारखं उत्साहीत आहे.

या अंकासाठी बऱ्याच विद्यार्थ्यांनी आपलं अनमोल असं सहकार्य दिलं. त्यांच्या कलाकृतीला, कल्पनाशक्तीला येथे वाव मिळेल अशी आशा करते. या अंकासाठी उत्तम कविता व लेख देणाऱ्या माझ्या सर्व लेखक, लेखिका, कवी, कवियत्री परिवारास माझ्याकडून मन:पूर्वक धन्यवाद. तुमच्यामुळे हा अंक अधिक खुलला व वाचनीय झाला.

सेल्फीच्या जमान्यात निसर्गाच्या विविध रूपांना टिपणाऱ्या फोटोग्राफर्सचे मनापासून आभार. निसर्गाचं रंगीबेरंगी रूप तुम्ही सर्वांसमोर आणलत. आपणच जणू त्या निसर्गाचे साक्षी आहोत हा भाव नकळत पणे तुम्ही आमच्या मनात आणला.

आमचा प्रयत्न आहे मुलामुलींनी स्वत:च्या कल्पनेतून नवनिर्मिती करावी. थेअरी बरोबर प्रॅक्टिकल चा ही विचार करावा. कोणत्याही गोष्टीचा अनेक अंगांनी विचार करण्याची सवय लावून घ्यावी. शारीरिक, मानसिक व बौद्धिक तीनही आरोग्यास समान महत्व द्यावे.

अंक वाचताना काही चुका आढळल्यास त्या निदर्शनास आणाव्यात. तसेच काही गोष्टी आवडल्यास पाठीवर कौतुकाची एक थाप द्यावी.

माणूस कितीही मोठा झाला तरी तो आजन्म विद्यार्थीच असतो. तो सतत काहीतरी नवीन शिकत असतो. वाचन आपल्या विचारांना प्रगल्भ बनवते. प्रत्यक्ष किंवा प्रत्यक्षपणे, कळत नकळत हे शिक्षण सुरु असतं. हा अंक तुमच्यासमोर याच भावनेतून घेवून आले आहे.

मानवाच्या आजन्म विद्यार्थी दशेस व ज्ञानार्जनास हा अंक समर्पित करीत आहे.

गीतांजली भोसले
७२१८८५११०२

संपादिका: गीतांजली भोसले
मुखपृष्ठ: श्री. अभिजित पंडित
टायपिंग व मांडणी: गीतांजली भोसले
पृष्ठे: ४०
मुल्य: रु. १००/-
अंक: पहिला
वर्ष : पहिले , नोव्हे. २०२०
प्रकाशक: क्विकसिल्वर आय टी सर्विसेस, कुपवाड.

# आवाहन

दिवाळी अंकाच्या निमित्ताने सुरु केलेला हा उपक्रम अखंडपणे पुढे सुरु राहावा. यासाठी सर्व विद्यार्थी, पालक, गृहिणी, लेखक, कथाकार, कादंबरीकार, कवि, कवियत्री, समीक्षक, विविध क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरी करणारे व आपला वेगळा ठसा उमटवणारे सर्व भारतीय नागरिक या सर्वांना मी विनम्र आवाहन करते की आपण आपल्या कथा, कादंबरी, आत्मचरित्र, (क्रमश: स्वरुपात) या अंकात सादर करण्यास इच्छुक असल्यास जरूर कळवावे. कविता, लेख, नाटक, चित्र, फोटो, प्रतिकृती (वैज्ञानिक मॉडेल), नवनवीन प्रयोग, शब्दकोडी, प्रकल्प, शोध, असं बरंच काही जे स्वत: निर्माण केले आहे ते कृपया या अंकासाठी पाठवावे. शालेय मुलांना देखील या उपक्रमात सामील करून घ्यावे. तुम्हाला कल्पना येणार नाही पण मुलांकडे खूप भन्नाट आयडिया असतात. त्यांना स्मृती अंकामार्फत आपण सर्वांपर्यंत पोहोचवूया. तुम्ही म्हणाल फेसबुक आहेच की, शिवाय व्हॉटसअप इंस्टाग्राम वगैरे सोशल मेडीया आहेच की, तिथे हजारो लाईक्स आणि कमेंट्स मिळतील तिथे इथे काय मिळणार? इथे मिळेल बक्षिस सर्वोत्तम लेखासाठी, सर्वोत्तम वैज्ञानिक मॉडेलसाठी, प्रयोग, कला सर्वांसाठी काही ना काही बक्षिस जरूर मिळेल. सर्वोत्तम असेल तरच. वर्षभरातून एकदा म्हणजे १२ अंकातून एक सर्वोत्तम असा लेख, कविता, सर्वोत्तम अशी कला, प्रयोग, वैज्ञानिक मॉडेल, निवडून त्यास उत्तम बक्षिस देण्यात येईल.

शिवाय इतर छोट्या छोट्या स्पर्धांचे आयोजन ही केले जाईल. आपण हा अंक विकत घेऊन त्याच्या सतत संपर्कात रहा व नियमित पणे वाचन करा. स्पर्धेत सहभागी व्हा. आपल्या इतर मित्रमैत्रिणींना ही यामध्ये सामील करा. सोबत आपला पूर्ण नाव, फोटो, मोबाईल नंबर, व पत्ता द्यावा.

अल्पदरात आपल्या जाहिराती देखील स्विकारल्या जातील. व त्यामुळे नकळतपणे आपला हातभार या अंकासाठी दिला जाईल. या अंकात फोन-पे चा कोड दिलेला आहे. त्यावर आपण पैसे पाठवू शकता. मासिकासाठी आपण देणगी स्वरुपात देखिल हातभार लाऊ शकता. अगदी ५०० रुपयापासून पुढे कितीही रुपये प्रोत्साहनासाठी व हा मराठी भाषेतील अंक सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी आपली मदत होणे आम्हाला बळ देईल. लायब्ररीसाठी किंवा वैयक्तिक, अंकाचे वार्षिक सभासद होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी आपले नाव नोंदवावे. आपल्याला दर महिन्याचा अंक घरपोच केला जाईल. तसेच त्याची पीडीएफ स्वरूपातील फाईल सुद्धा पाठवली जाईल.

फक्त आपल्याला एक काळजी घ्यावयाची आहे ती म्हणजे या अंकात सोशल मेडिया वरचे फोरवर्ड केलेले पोस्ट नसावेत. सर्व लेख/कविता स्वत: केलेल्या असाव्यात. सदर अंकातील भाग जर संदर्भासाठी आपण कोठे वापरत असाल, तर या अंकाचा तसेच लेखक, कवी, यांचा आवर्जून उल्लेख करावा. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी असलेला हा अंक आपण सर्वांनी मिळून सर्वोत्तम बनवूयात.

धन्यवाद.

ऑफिसचे नाव: क्विकसिल्वर आय टी सर्विसेस, कुपवाड

पत्ता: साई सोसायटी, विजयनगर कुपवाड रोड, चाणक्य हॉटेल जवळ, चंद्रकांत ऑटो गरेज शेजारी, कुपवाड, तालुका मिरज, जिल्हा. सांगली

Email-Id: quicksilver016@gmail.com

संपर्क. 7218851102

# अनुक्रमणिका


दोन शब्द आभाराचे: गीतांजली भोसले १
आवाहन: गीतांजली भोसले २
हिरव्या गोष्टी: श्री. नंदू गुरव ४
आली दिवाळी: गीतांजली भोसले ६
गजवंदन: कै. सावित्री पवार ७
सुंदर विचार हस्ताक्षर: सौ. दिप्ती धुमाळ - बिनवडे ८
आम्ही भारतीय: श्री. गजानन बा. मोहिते ९
रांगोळी : सौ. शुभदा रा. लाड ११
परदु:ख: सौ. योगिनी मो. भोसले १२
फोटोग्राफी: श्री. योगेश कोरे १६
लहानांसाठी: शब्दकोडे १८
फोटोग्राफी: श्री. योगेश गुरव १९
माझे वडील: श्रीमती सुषमा र. गोखले २०
बाबा : शर्वरी रमेश गोखले 21
कविता: पाऊस, पहिली भेट,
तिची माझी ओळख: रोहित माने २३
बालसंस्कार: सौ. कमल जाधव २४
चित्रकला व फोटोग्राफी : कु. नेहा मोहिते २५
पिकल्या पानाचा कोवळा देठ:
सौ. योगिनी मो. भोसले २६
टाकावू पासून टिकावू:
सौ. उषा मोहिते, श्रीमती संजीवनी भोसले २७
कविता: कोरोना: श्री. विजय मनोरकर २९
पेंटिंग: श्री. प्रसाद कामत ३०
कविता: युद्ध, श्री. विजय मनोरकर ३०
छोट्यांसाठी कविता:
ढग, बाग, चिकन बाळ, स्नेहाराणी: कै. सावित्री पवार ३१
चित्रकला, पाण्याचे चक्र (मॉडेल),
ग्रीटिंग, (हत्ती: क्राफ्ट): वेदिका गोरे ३२
हस्तकला: हापश्याची गाडी (मॉडेल), चित्रकला, ग्रीटिंग,
मसालापदार्थ बोर्ड, बैलगाडी (मॉडेल):
सार्थक शेजूळ ३३
एटीम मशीन (मॉडेल), डायरी (मुळाक्षरे)
चित्रकला: श्रुती व स्वराली शेजूळ ३४
चित्रकला: आरती, वैष्णवी इरकर ३५
चित्रकला: सृष्टी शेजूळ ३६
पेंटिंग: आदित्य कांबळे ३७
हस्तकला: घरटे, फुलदाणी, फूल:
सौ. प्रियांका घारगे ३७
केक: सृष्टी शेजूळ ३८
मी पाहिलेला महापूर लेख व चित्रकला:
अनुष्का जाधव, ३९
कविता: यशस्वी भव: गीतांजली भोसले ४०



# हिरव्या गोष्टी

नंदू गुरव, सांगली
९८२२६५५३३३

धाडदिशी प्रेमात पडायचे दिवस होते तेव्हा, मी पण पडलो होतोच नाही असं नाही. पण यात काही शौर्यबिर्य नसल्यानं इतिहासानं त्याची म्हणावी तशी दखल घेतली नाही. पुढं मग प्रेमात पडलोयचं तर चोरून हिरव्यागार झाडीत दडणं-बिडणं, उठणं-बसणं, हसणं-रडणं आलं. संकटकाळात निसर्गाचा असा थेट जीवावर बेतणारा रोजचा संबंध आला. पुढं मग प्रेमात पडल्यावर रीतसर लग्न आलं, संसार आला, पोरंबाळं आली. आता यात पण कसलं शौर्यबिर्य नसल्यानं इतिहासानं याची पण दखल घेतली नाही. नसेना का, पण त्या दडायच्या दिवसात जिवावर उदार होत ज्या हिरव्या कोपऱ्यांनी आम्हाला छुपी जागा दिली त्या ग्रीन कॉर्नरांचे उपकार मात्र मी विसरलो नाही. अजूनही मी कधी कधी एकटाच झाडीत जाऊन दडतो. ताजा होतो. बरं वाटतं. अजून जगावं वाटतं.

पुढं मग मी पत्रकार झालो. बातम्यांच्या मागं लागता लागता कधीमधी ड्युटीसाठी ऑनड्युटी झाडात घुसावं लागतं, त्याला इलाज नाही. सुदैवानं बऱ्याच 'रेड अँड हॉट' न्यूज ग्रीन कॉर्नरवरच घडतात. पूर्वीही घडायच्या, नाही असं नाही, पण त्यावेळी हे कॉर्नर आजच्या इतके बदनाम झाले नव्हते. आज साधं सख्ख्या बायकोला घेऊन आमराईत गेलं तरी माणसं संशयानं बघतात. दोष कॉर्नरचा नाही. अत्यंत पर्सनल गोष्टी माणूस सरळसरळ उघड्यावर उरकायला लागल्यावर दुसरं तिसरं काय होणार?... वाटतं अशा दिलफेक 'कर्तबगारी'नं ग्रीन कॉर्नर रेड व्हायच्या अगोदर हे सारं थांबवायला हवं.

दिलफेक करायची हुकी यावी असा सांगलीतला ग्रीन पॉईंट म्हणजे शांतीनिकेतन. हिरव्यागार झाडांची आभाळमाया पांघरून बसलेलं हे शांतिनिकेतन दिल आणि दिमाग ठंडा करतं. भर पावसाळ्यात एखाद्याला डोळं बांधून या हिरवाईत सोडलं आणि कुठं आलायस ओळख म्हटलं तर तो हमखास 'कोकणात आलो लेका' म्हणेल, असलं सारं फिलिंग. गौतम पाटीलसारख्या एव्हरग्रीन माणसानं दिलसे ही हिरवळ जपलीय. तो मुलखात फिरतो आणि वेगवेगळी झाडं आणून शांतिनिकेतन मध्ये लावतो. पाच हजार हिरव्यागार आणि डेरेदार झाडीत पाखरांच्या किलबिलाटात शांतिनिकेतनचा दिवस उगवतो. कलाविश्व महाविद्यालयाच्या कलाकार विद्यार्थ्यांनी या हिरवाईतच कलाग्राम उभं करायचं ठरवलंय. लाल मातीच्या कोकणात एखादं खेडं आपसूकच हिरवाई घेऊन नाचावं तसं हे शांतिनिकेतन.

.... आणि इधर ही दफनभूमी जन्नत. सांगली में अगर कही स्वर्ग है, तो यही है, यही है...! पार गुजरातहून मेहमान आले की चायवाय बाद में, साबजी पयले हमें दफनभूमीमें जाना हैं... असं म्हणत सीधा मार्केटयार्डातल्या दफनभूमीत जातात. जिंदगीभर राब राब राबलेल्या माणसाला मौत के बाद सच्ची अमन आणि शांति मिळते का नाही माहिती नाही. पण सांगलीतल्या दफनभूमीत जिंदा माणसांनाही सुकून मिळतो. कधी काळी याच जाग्यावर डरावनं कब्रस्थान होतं. पण मुन्ना कुरणे नावाच्या एव्हरग्रीन माणसानं ते पार बदलून टाकलं. कब्रस्थानची जन्नत केली. खूबसूरत फुलझाडीतनं गेलेल्या वाटा, कबुतरांची गुटर्रर्रगू पाच हजार झाडांची हिरवीगार गर्दी, पाण्याचे फवारे, नमाज, माणसानं जगावं इथं आणि मरावंही इथंच.

नाही म्हणायला जरा चौथ्या-पाचव्या मजल्यावर गेलं आणि सांगलीवर नजर टाकली तर सारी सागंली हिरवीगार दिसतेच. नारळाच्या बागा, गर्द झाडांचा हिरवा पट्टा दिसतो. सांगली सांगली ती केवढी? वानलेसवाडी ते सांगलीवाडी. धामणी रोड ते माधवनगर रोड. झाली ! पण ती हिरवी आहे. ओॲसिससारखी ती नेचरनच जपलीय. बायपासच्या पुलावरनं पलीकडं आणि बंधाऱ्याच्या पुलावरनं अलीकडं पाहिलं की कृष्णेच्या काठावरची झाडी अंगावर येते. नदीनंच ही झाडी जपली. पुराच्या नाकावर टिच्चून ती ताठ बुंध्यानं उभी राहिली. त्यांनी कुठली नुकसान भरपाई मागितली नाही की ती कुणावर कोसळली नाहीत. झाडं ती झाडं आणि माणसं ती माणसंच शेवटी.

नॅचरली तयार असलेली घाटासारखी ग्रीन स्टेशनं माणसांनी उद्यानासारखीच बदनाम करून सोडली. संस्कारांचे अंत्यसंस्कार झाल्यावर हल्ली घाटावर अंत्यसंस्कार कमी आणि इतर उद्योग भरभराटीला आलेयत. पण याच घाटावर वसंतदादास्मारक मात्र आपली हिरवाई जपून आहे. हिरवी झाडं आणि हिरवळ त्यावर चाफ्याच्या फुलांचा सडा. गोल गुळगुळीत दगडं अशी चांदण्यांसारखी रचून ठेवलेली. स्मारकावरची सायंकाळ शांत असते. अशीच हिरवाई वसंतदादांच्या साखर कारखान्यावर, त्यांच्या पुतळ्याच्या अवतीभवती ही आहे.

सांगलीचा प्रत्येक रस्ता झाडीत आहे. प्रत्येक झाडीत रस्ता आहे. सांगलीतून हरिपूर आणि हरिपूरातून अंकली, फळमार्केटवरून धामणी, कुपवाडवरून जुन्या रस्त्यानं बुधगाव, शंभर फुटीच्या कॉर्नरवरनं धामणी, बायपासवरनं डिग्रज... गाडी काढून या रस्त्यावरनं नुसत्या बिनकामाच्या भरकटसारख्या चकरा मारल्याशिवाय हिरवाईची जादू समजणार नाही. बऱ्याच उपनगरांनी हिरवाई जपलीय. तात्यासाहेबांचा मळा, सह्याद्रीनगर, कलानगर, नेमिनाथनगर, गुलमोहर कॉलनीम शिवाजी हौसिंग सोसायटीसारखी उपनगरं तर दाट झाडीतच वसलीयत.

... बाकी सांगलीतल्या कोणत्याच उद्यानात दिल लागत नाही. का माहिती नाही, पण सारी हिरवळ उगाचच नाटकी वाटते.

हिरवा कलर देऊन उभी केल्यासारखी. झाडं आणि उगाचच व्हेंटीलेटर वर ठेवल्यासारखी हवा...!

महावीर उद्यानात चांगले बदल होताहेत. संध्याकाळी हव्या त्या वेळी हव्या त्या व्यक्तींच्या आगेमागे वॉकिंग करणाऱ्यांसाठी महावीर उद्यान नंबर वन. आमराईचं तसं नाही. आमराईत वॉकिंग कमी टाँटींग किसिंगच जास्त. इकडं भर रस्त्यात भेळ हादडत बसणं शोभणार नाही म्हणून प्रतापसिंह उद्यानात गर्दी. तसं आत जाऊन बसण्यासारखं काय आहे? ना प्रायव्हसी, ना हिरवळ. भेळ खा.... घरपोच व्हा. बाकीची उद्यानं लफडेबाजांनी हायजॅक केली आहेत. उद्यानात हिरवळ नसली तरी येणारी माणसं हिरवीगार असतात. त्यामुळं उद्यानाचा लौकिकही ताजा राहिलाय, नाही असं नाही पण आता यात कौतुकबिवतुक नसल्यानं इतिहासानं त्याची म्हणावी तशी दखल घेतली नाही, इतकंच.

बाकी ढोल्याचं पोट सुटावं आणि काही केल्या ते आवाक्यात येऊ नये तशी सांगली आता चारी बाजुंनी अगडबंब वाढायला लागलीय. धामणीरोड -हरिपूर रोड - माधवनगररोड - मिरजरोडवरच्या मोकळ्या जागांवर आणि ग्रीन प्लॉटसवर इमारती नाचायला लागल्या आहेत. माणसाला आता सिटीत राहायचं नाही, निसर्गात राहायचं आहे. आता शेजारी म्हणून निसर्गाला माणूस हवाय का नको ते कोण विचारणार? विचारलं तर निसर्गाचं कोण मनावर घेणार? निसर्गच इतिहास जमा झाल्यानं म्हणा किंवा कसं पण तो आपल्यात जमा झाल्याची नोंद त्यानंही मनापासून घेतली नाहीये.

असंच सारं काही नाही, कारण निसर्गाच्या नादानं हिरव्या झालेल्या काही ग्रीन माईंडेड माणसांना बाहेर निसर्गाचं काही खरं नाही, असा साक्षात्कार झाल्यानं त्यांनी मग आपली घरंदारं ग्रीन करायला सुरुवात केलीये. ही माणसं तशी खुळी आहेत. निसर्गाच्या नादाला लागून यांनी घराचं पार जंगलबिंगल करून टाकलंय. फॅक्टरीत, घरात, दारात, खिडक्यात, जिन्यात, बाथरूमात, बेडरूमात झाडंच. असं कुठनंही झाडं चोरून बघताना कसं वाटतं? प्रायव्हसी म्हणून काही नाहीच. ग्रीन कॉर्नरवरच्या ग्रीन टीम मधील ही काही ग्रीन माणसं.... प्रा. सुरेश गायकवाड, 'स्टुडीओ'वाले आर्किटेक्ट प्रमोद चौगुले, रोज सोसायटीवाले प्रकाश चव्हाण, विजय बक्षी, सतिश डोडिया, प्रविणशेठ लुंकड, तानाजीराव मोरे, डॉ. रविंद्र व्होरा, पापा पाटील... पण झाडांवर प्रेम करणं आणि झाडांना जिवापाड जपणं यांत काही शौर्यबिर्य नसल्यानं इतिहासानं त्याची म्हणावी तशी दखल घेतली नाही. नसेना का...!













# आली दिवाळी....

गीतांजली भोसले
७२१८८५११०२

'दिवाळी आली दिवाळी आली मोती स्नानाची वेळ झाली' असं महिनाभर आधी जाहिरात सुरु झाली की इकडे सर्वांची दिवाळीची तयारी सुरु होते. विविध माध्यमांवर, सोशल मेडियावर दिवाळीच्या फराळाच्या रेसिपीज बघायला मिळतात. एक सिक्रेट पदार्थ प्रत्येक रेसिपीवाल्यांकडे असतो हे विशेष. घरातल्या आया-बाया म्हणजेच आई, काकू, आजी, मावशी, मामी, आत्या. नवीन लग्न झालेली दिदी किंवा वहिनी या सर्वांची एकच चर्चा अगं तुझी चकली मागच्या वेळी खूपच छान झाली होती बघ. तू कोणता नवीन मसाला वापरला होतास ?, वगैरे वगैरे. सामानाची ती एवढी मोठी लिस्ट काढायची. ती काढत असताना यांना द्यायला पाहिजे, लेक येणार आहे जाताना तिच्याबरोबर थोडं द्यायला हवं, माझ्या पप्याला चिवडा फार आवडतो, त्याच्यासाठी जरा एक काकणभर जास्तच करते बाई. सुनबाईंना वेळ मिळत नाही कामातून मग आपलं पिलू उगीच उपाशी रहातं. जरा चार दिवस नाष्टा करेल फराळाचा. या सारखी अनेक कारणे शोधून घरातल्या मंडळीना दिवाळीचा फराळ जरा जास्तच करायचा असतो.

सगळ्या प्रकारच्या रेसिपीज चेक करून झाल्या की कोणी ठमाबाई म्हणते नाई बाई मला नाही हे काय जमायचं उगीच काय चुकलं म्हणजे मी आपली आपल्या नेहमीच्या पद्धतीनेच करते. कोणाचा पहिलाच प्रयोग एकदम भन्नाट होतो. दिवाळीच्या दिवशी फराळ करून सासू सासऱ्यासकट सगळे अगदी डोळे मिचकावत वाह वाह करत सुनेचं गुणगात गात फराळ करतात. आणि एखाद्या मामीचा फराळ प्रचंड कामाच्या व्यापामुळे मागच्या सारखा काही जमला नाही लाडू असा सूर येतो. वेळात वेळ काढून पहाटे रात्री जागून फराळ केल्यानंतर ही एखादी आजी म्हणते, हळूच मला किनई तिची चकली जरा कडकच लागली. मेल्या मला म्हातारीला आता दात नाहीत. खूप आवडून सुद्धा चकली काही खायला मिळायची नाही. असं तोंडाने म्हणत हाताने खलबत्त्यात चकली कुटून खायचा प्रकार तोंडाने चालूच असतो. ..आणि मीठही जरा कमीच होतं. जरा म्हणून येभाव येत नाही माझ्या सुनेला. असे म्हणताच आजे सासू सूर ओढतातच, वर्षातनं एकदा स्वयपाक कट्ट्याकडे फिरकल की दुसरं तिसरं काय होणार, सगळ्या सुना असल्याच. (स्वत:च्या सुनेला टॉंट बरं का !) आतून हे सगळं सून ऐकत असतेच. आपला सगळा राग आपल्या चिंटूवर रोहन तुला कितीदा सांगितलंय मध्ये मध्ये करू नकोस म्हणून. जरा उमजू दे बघू मला. जा पाहू आजीला म्हणावं मला गोष्ट सांग. असो.

इकडे बाहेर सर्व छोट्या गॅंगची किल्ला करण्यासाठी धडपडत असतात. एरवी सतत ओरडणारे पालक यावेळेस कौतुकाने मुलांचं मातीत खेळणं बघत असतात. सर्वांनी मिळून दगड, विटा, गोळाकरून लांब लांब सायकलीवरून माती आणणं सुरु असतं. यामध्ये सहभाग घ्यायला न मिळालेली चिनू मीनू कागदाच्या पताका, पुठ्याचा बुलंद दरवाजा करण्यात रंगून गेलेली असतात. तर घरातल्या प्रत्येक व्यक्तीने आपल्या लहानग्यासाठी असू दे म्हणत किल्ल्यावर ठेवण्यासाठी चित्र (मातीची खेळणी) आणलेली असतात. मुलांचाही आमचं महाराज (छत्रपती शिवाजी राजे) मोठं सिहासनावर बसलेलं पाहिजेत असा आग्रह असतो. पण ही सगळी मजा मोठं आंगण असलेली मुले घेऊ शकतात. अपार्टमेंट मध्ये राहणारी किंवा अगदी जवळ जवळ घर असलेली (सांगलीतल्या गावभागसारखी) ) मुलं हा आनंद घेऊ शकत नाही. ते आपले तयार किल्ल्यावर समाधान मानतात.

तिकडे बाबा, काका, मामा, दादा, यांना आपल्या सौ. साठी उत्तम साडी आणण्याची आणि छोट्यांसाठी कपडे आईबाबासाठी कपडे आणण्यासाठी जुळवाजुळव चालू असते. झालाच बोनस जरा जास्त किंवा वर्षभराची या दिवसासाठी केलेली बचत आता उपयोगी येते एखादा दागिना बसतोय का बजेटमध्ये, किंवा काही छान वस्तू विकत घेता येतेय का ते बघतात. आपली खरेदी त्यांनी केव्हाच उरकून टाकलेली असते. लहान मुलांना तसं फारसं अप्रूप नसतंच या गोष्टींचं. भरपूर सुट्ट्या आणि मातीत खेळण झालं की बास. शिवाय आईबाबांनी सिलेक्ट केलेल्या कपड्यात ते खुश असतात. जनरली प्रत्येक आईबाबांना आपल्या मुलाला किंवा मुलीला उत्तम कपडे घ्यायचे असतात त्यामुळे इथे कोणतीही अडचण सहसा येत नाही. एखाद्याने केलाच हट्ट मला अमुकतमुक फॅशनचे कपडे पाहिजेत तरी तो लगेच पूर्ण केला जातो.

त्यातल्या त्यात तरुणाई जरा जास्त बारकाईने आपले कपडे निवडतात. स्वत:ला आवडण्यापेक्षा (आपल्या स्वप्नातल्या परीला किंवा प्रिन्सला) तिला किंवा त्याला आवडेल का याचा विचार जास्त केला जातो. मग सेकंड चॉईस आपला. असो. पण घरच्या सर्व कामांनी दमून गेलेल्या आणि ऑफिसच्या कामाची टांगती तलवार असणाऱ्या सर्व गृहिणी आणि नोकर वर्गातील स्त्रियांच्या मनात नाही म्हटले तरी एकच विषय सुरु असतो. या वर्षीची दिवाळीची साडी. (भलेही वर्षात बारा इतर साड्या झालेल्या असू देत) पण या वर्षीची दिवाळीची साडीचं अप्रूप काही निराळच असतं. कितीही दुकानं पालथी घातली आणि कितीही वेळा साड्या बदलल्या तरी ऐन दिवाळीला लक्ष्मीपूजनदिवशी आलेल्या एखाद्या नव्या माहेरवाशिणीची साडी खूपच आवडलेली असते. त्यासमोर आपली साडी खास वाटत नाही.

सर्रास सगळयांच असंच असतं. नोकरवर्गापासून व्यावसायिकांपर्यंत. स्वप्न थोडी छोटी मोठी असतील ही

आपल्या आपल्या ऐपतीप्रमाणे. पण ते सर्वजण आपल्या स्वप्नामध्ये ते पूर्ण करण्यामध्ये खुश असतात. कोणी या मुहूर्तावर जागा, फ्लॅट खरेदी करणार असतं. तर कोणी छोटसं मंगळसूत्र, कोणाला नवा व्यवसाय सुरु करायचा असतो तर कोणाचं लग्न ठरणार असतं. असे बरेच काही या दिवाळी निमित्त घडणार असते. एकूणच काय प्रचंड धमाल सुरु असते या दिवसात...

आणि बरं का एखादे आजी आजोबा, किंवा वाचनाची आवड असणारे ताई दादा, एखाद्या छोट्या सुद्धा दिवाळीचा फराळ करत करत किंवा संध्याकाळच्या मस्त गार हवेत टेरेस वर बसून माझा हा दिवाळी अंक सुद्धा वाचतात बरं का.

सणांच्या निमित्ताने सर्व एकत्र येतात. खूप भारतीय उद्योग छोटे मोठे व्यावसायिक त्यावर आपले उदारनिर्वाह करतात. घरापासून लांब गेलेले सणाच्या निमित्ताने का होईना पण पाखरू घरट्यात परत आल्यासारखे आपल्या घरी येतात. आईबाबांना तेवढाच दिलासा मिळतो. मायेची ऊब, नातवाचं, सुनेचं मुलाचं कौतुक करता येतं. सुट्टीच्या निमित्ताने एकत्र कुठेतरी छोटीशी ट्रीप होते नव्यानं जग बघता येतं फिरता येतं. बाहेरचे झालेले बदल न्याहाळता येतात. माहेरवाशिणीला तेवढेच दोन दिवस का होईना पण थोडीशी विश्रांती आणि कोडकौतुक करवून घेता येतं. झालीस तर आईबाबांची सेवा करण्याचा चान्स मिळतो. आधी कधीही स्वयपाक घरात न गेलेली ती आता नवे नवे पदार्थ बनवून आईला आणि बाबांना भावाला बहिणीला खायला घालते. मुलगी येणार म्हणून काय काय करून ठेवलेलं असतं आईने, मायेची साड्यांची उबदार गोधडी असते, आवडतो म्हणून एखादा पदार्थ असतो. आणि बरंच काही.

फटाक्यांची आतषबाजी, पणत्यांची आणि दिव्यांची रोषणाई, सुग्रास फराळ, सुंदर सुंदर नवे कपडे आणि काही काही जे पैश्यांनी विकत मिळतं या सर्वांपेक्षा कितीतरी सरस असतं ते मायेनं प्रेमानं दोन दिवस एकत्र येणं. हा सण असं एकत्र आणतो सर्वांना आणि म्हणूनच मला तो खूप खूप आवडतो.

अशा माझ्या दोस्तांना तसेच सर्व आजी आजोबांना काका, काकू, मामा, मामी, मावशी, काका, आत्या दादा, वहिनी, दीदी, आणि सर्व छोट्या, मोठ्या मित्रांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा.

## चुटकुले

छे!! मी हे गणित कसे सोडवू?
गणित खूपच अवघड आहे.



आमच्या बाईंनी सांगितलंय,
कोणती गोष्ट येत नसेल तर
त्याच्या हात धुऊन मागे लागा.



# गजवंदन

कै. सावित्री पवार
सौजन्य: प्रियांका घारगे (मुलगी)
८८३०३२८५८५

पायी रुणुझुणु करिती पैंजण
चंदनीहार गळा दिसतो शोभून
रक्त गंधित फुले वाहते तव चरणा
वंदिते तुजला हे गजवदना

दु:ख हारिशी, विघ्न विनायका
संकटात ये धावुनी गजमुखा
सुख नांदू दे सदा आमुच्या सदना
वंदिते तुजला हे गजवदना

जीवन असे हे सुखदु:खाचा सागर
भरलेले आहे येथे द्वेष नी मत्सर
सदा राहू दे चित्त तव चरणा
वंदिते तुजला हे गजवदना



# सुंदर विचार सुंदर हस्ताक्षरात

## हस्ताक्षर

सौ. दीप्ती धुमाळ-बिनवडे
९९७५९५२५८७

A meaningful Life
is not being rich, being popular,
being highly educated,
or being perfect.
It's about being "Real"
being "Humble", being able
to share ourselves and
touch the lives of
"Others"

Dipti

People with purpose,
goals, and visions have
no time for dramas

"Umbrella"
can't stop the rain but
can makes us stand in
"Rain"
"Confidence"
may not bring success but
give us power to face any
"Challenge" in Life.

A.P.J Kalam

A Dream written down with a
date becomes a "Goal".....
A goal broken down into a
step becomes a "Plan".....
backed by "Action"
becomes "Reality"

Dipti

7 Rules of Life

Dipti



# आम्ही भारतीय

ग. बा. मोहिते
१६२३७४६७२०

रूढी,परंपरा,कुळाचार --- इ. शब्द नेहमीच आपल्या कानावर पडत असतात. त्याबद्दल वेगवेगळी मतेही मांडली जातात. काही मते या सर्व परंपरा काटेकोरपणे पाळल्या पाहिजेत. याचे समर्थन करणाऱ्या असतात, तर काही त्याच्या पूर्ण विरोधात असतात. अगदी दुसऱ्या टोकाच्या असतात. काही माध्यम मार्गी असतात. असे जरी असले तरी सामान्य जनांचा विचार करता त्यांच्या मनावर या सर्व रूढी, परंपरा, कुळाचार इ.इ. चा जो पगडा आहे तो बदलत नाही असेच चित्र दिसते. अनेकदा हे अशा अशा पद्धतीने किंवा रीतीनुसार केले नाही तर लोक काय म्हणतील या भीतीपोटी करतात. आणि दुसरे म्हणजे या गोष्टी रिवाजाप्रमाणे नाही केल्या तर पाप लागेल, आपल्याला स्वर्गात जागा मिळणार नाही, किंवा आपल्या पितरांच्या आत्म्याला मुक्ती किंवा शांती मिळणार नाही.इ. प्रकारच्या भीतिपोटी केल्या जातात.

या सर्व गोष्टी धर्माप्रमाणे बदलतात. हिंदू धर्मात त्या जात, पंथ, संप्रदायाप्रमाणे बदलतात. निरनिराळ्या जात, पंथ, संप्रदायामध्ये वेगवेगळ्या पद्धती रूढ असल्याचे दिसते. आपल्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत अनेकविध संस्कारातून आपण जात असतो. अगदी पाचवी पुजण्यापासून ते अंत्यसंस्कारापर्यंत. या चालीरीतीमध्ये देशात सर्वदूर फरक आढळून येतो. यामुळे धर्मात एकसंधता राहत नाही. धर्मात नाही म्हणजे त्या माणसांमध्येही नाही. एकाच धर्मातील माणसे निरनिराळ्या अनेक गटात विभागली गेल्याचे दिसते. त्यात वेगवेगळे पंथ, संप्रदाय, जाती, पोटजाती आहेतच.

भारतात सख्येने सर्वात जास्त असलेला धर्म म्हणजे हिंदू. तो हिंदू एक व्हावा असे तर धर्मातील सर्वांनाच वाटते. असे न वाटणाऱ्यांची संख्या फारच थोडी असेल. या धर्मात अनेक जाती, पंथ, संप्रदाय अस्तित्वात आहेत. त्यांच्या संस्करणाचे, चालीरीतींचे, प्रकार आणि मार्गही भिन्न आहेत. त्या त्या वेळच्या परिस्थितीनुरूप त्यावेळी असलेल्या धर्ममार्तंडांनी आणि विचारवंतांनी आपापल्या विचाराने वेगवेगळ्या चुली मांडल्या असतीलही पण आताही त्या तशाच राहाव्यात काय ? त्यात काही बदल करून सर्वांनी एकाच धर्माच्या छत्राखाली समान चालीरीती अनुसरल्या, अगदी काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत सर्वजण त्यात समाविष्ट झाले तर किती छान होईल असे नेहमी वाटते. विविधतेत एकता हे म्हणायला, सांगायला छान आहे, पण खरेच ती एकता आहे काय ? आपापल्या मनालाच विचारा ना.

जुन्या चालीरीती वाईट आहेत असे नव्हे. त्या चालीरीती त्या काळातील लोकांची गरज, सोय इ. पाहून माणसांनीच ठरवलेले आहे. त्यावेळच्या परिस्थितीत आणि आताच्या परिस्थितीत खूपच फरक झालेला आहे. मग आताच्या परिस्थितीनुरूप त्यात आवश्यक ते बदल केले किंवा त्यातील काही भाग कमी करता आला अगर वगळता आला तर तसा प्रयत्न करायला काय हरकत आहे ?
या विज्ञान युगात आपण अनेक जुन्या गोष्टी सोडून देऊन नव्याचा स्वीकार केला आहे. विजेची उपकरणे ,इलेक्ट्रॉनिक उपकरणे, सौर ऊर्जा इ. इ. जसे विद्युत पंखे, दिवे, फ्रीझ, मिक्सर, शेगडी, गॅस, टी.व्ही., सिनेमे, दुचाकी अन चारचाकी वाहने इ. अनेक नव्या शोधांचा आणि ऊर्जांचा स्वीकार आपण केला आहेच. तर मग धार्मिक आचार संहितेतही काही बदल करायला आणि ते सर्वांनी स्वीकारायला काय हरकत आहे ?

तसे काही बदल आपण स्वीकारलेही आहेत. उदा.:- सतीची प्रथा, केशवपन, पुनर्विवाह, स्त्री शिक्षण ..... इ. इ. या बदलांनाही विरोध नव्हता असे नाही. पण त्या बदलाचे चांगले परिणाम दिसून आल्यावर विरोधकही निवळले. सर्वांनीच हे बदल आनंदाने स्वीकारल्याचे चित्र आपण पाहतो आहोत. मग आणखी काही बदल करून ते सर्वांनीच स्वीकारून एका छत्राखाली यायला काय हरकत आहे ? आता सर्वच धर्मांच्या धर्मपीठांनी, धर्ममार्तंडांनी, विचारवंतांनी एकत्र येऊन किमान भारतात तरी स्थापन करावा कि ज्यात जाती नाहीत, सर्व विधी, रीती, नियम एकाच पद्धतीने करण्याचे ठरवून, आम्ही भारतीय म्हणून स्वीकारावेत असे वाटते.

संत ज्ञानेश्वरांनी त्यासाठी वैष्णव धर्माचा पुरस्कार केला. त्याकडेही आम्ही पाठ फिरवली. संतांची थोरवी गायची तीही त्यांच्या पुण्यतिथी किंवा जयंतीला. तीही त्या त्या पंथातील, धर्मातील, जातीतील लोकांपुरतीच मर्यादित राहिली आहे. बाकीचे फक्त उपचारापुरते. आपले फोटो आणि कार्यक्रम माध्यमावर दाखविण्यापुरताच तो उपचार असतो. उदा. : - गुरु नानक जयंती, महावीर जयंती, बसवेश्वर जयंती, बुद्ध जयंती /पुण्यतिथी इ. अशा अनेकांचे उत्सव आपण साजरे करत असतो. त्या दिवशी शासकीय सुटी जाहीर करतो. प्रत्येकजण आपापल्या परीने त्या सुटीचा आनंद लुटत असतो. अनेक विचारवंत, नेते, पुढारी निरनिराळ्या मंचावरून

त्यांचे गोडवे गात असतात. त्यापैकी एकही असे म्हणत नाही, की त्या महामानवांनी अमुक अमुक गोष्टी त्यांच्या धर्मात चांगल्या सांगितल्या आहेत. त्या अनुसरण करण्यासारख्या आहेत. त्या आपल्या धर्माने स्वीकारल्या पाहिजेत. त्यासाठी चळवळ उभी करणे तर खूप लांबची गोष्ट आहे.

एकानेही या गोष्टींचा उच्चारही केल्याचे दिसले नाही, ऐकिवातही नाही. आपण आणि आपले नेते अनेक चळवळी उभ्या करतो. त्यात कामगार, नोकरदारवर्ग त्यांच्या आर्थिक फायद्यासाठी उतरलेला असतो. काही धार्मिक आणि जातीय चळवळीही असतात. त्याही त्या त्या धर्म किंवा जातीतील लोकांच्या आर्थिक फायद्यासाठी असतात. त्याचे फायदेही त्या त्या धर्मातील, जातीतील सुस्थितीत असलेले लोकच मोठ्या प्रमाणात घेताना दिसतात. अशा अनेक चळवळींचे नेतेही या धार्मिक सुधारणांच्या बाबतीत बोटचेपे धोरण करताना दिसतात.

भारतातील सर्व धर्मातील नेते आणि विचारवंत तसेच धर्मगुरूंनी एकत्र येऊन याविषयी विचारविनिमय करावा असे वाटते. सर्व धर्मातील चांगल्या, लोकोपयोगी तसेच सर्वांना सोयीच्या अशा गोष्टी एकत्र करून आसेतु हिमाचल एकच धर्म मान्य करून जनतेलाही पटवून देतील. सर्वांना समान नियम लावून त्या नव्या भारतीय धर्माची स्थापना होईल आणि लोक तो मनापासून स्वीकारतील तो दिवस म्हणजे भारतातील खरी दिवाळी असेल.

धर्म कसा असावा यासाठी श्री संत तुकडोजी महाराज यांनी त्यांच्या ग्रामगीतेत एक पूर्ण अध्याय 'धर्मध्यायन' दिला आहे.
त्यातील काही भाग पहा.

नको धाक तलवारीचा। चुकीस्तव तळमळे आत्मा साचा।

साक्ष देतो अंकुश देवाचा। अंतरामाजी ।।

ऐसे ज्याचे हृदयी स्फुरण। तोचि खरा धर्मवान ।।

बाह्य अवडंबर धर्मचिन्ह। ते ते गौण धर्म नव्हे ।।

शुद्ध सात्विकता प्रकट करावी। लौकिक तीच जागवावी ।।

आपल्या चारित्र्याने सांभाळावी। सुव्यवस्था जगाची ।।

व्यक्तीधर्म कुटुम्बधर्म। समाजधर्म गावधर्म।

बळकट होई राष्ट्रधर्म। प्रगतीपथाचा ।।

व्यक्ती व्हावी कुटुम्बपूरक। कुटुंब व्हावे समाजपोषक।

तैसेचि ग्राम व्हावे राष्ट्रसाहाय्यक।राष्ट्र विश्वा शांतीदायी ।।

याकरिता जी जी रचना। तियेसी धर्म म्हणती जाणा।

देशद्रोह, अधार्मिकपणा। एकाच अर्थी ।।



फोटोग्राफी : योगेश गुरव
९८६०८१५५७८



# रांगोळी डिझाईन्स



सौ. शुभदा राहुल लाड
९१४६०३७५३३














# परदु:ख

सौ. योगिनी मोहन भोसले
७५८८२५५८५०

हमखास पाऊस देणाऱ्या नक्षत्रांना भूल देऊन दडी मारून बसलेला पाऊस आज दुपारपासून अचानक अवतरला. सात वाजायला आले तरी पाऊस थांबायचं नाव घेईना. म्हणून मनिष पडत्या पावसातच घरी यायला निघाला. बिल्डींग मध्ये शिरून जिना चढत असतानाच त्याची पत्नी पूनम त्याला सामोरी आली. त्याच्या हातातील बॅग आपल्या हातात घेऊन डोळे पुसत पुसत पूनम म्हणाली, किती उशीर लावलाय आज. पाऊस पडतोय बघतेस ना. आणि तुला रडायला काय झालय? मनिष धास्तावलाच. वर चल आधी मग सांगते. घरात शिरतानाच ती म्हणाली, 'अरे वर्तकांच्या शैलेशला अपघात झालाय. असा फोन आला होता वर्तकांच्या घरी आणि मग शैलेश ओन-द-स्पॉट गेला असा दुसरा फोन. तुझी केव्हाची वाट बघतेय सगळी मंडळी तिकडेच गेली आहेत एक्सिडेंडकडे. फक्त तुझाच संपर्क झाला नाही. मी निघाले त्यांच्याकडे. मीराकाकूंची अवस्था खूप वाईट आहे. आपल्या आशूला मी ताईकडे पाठवले आहे. तिकडेच राहील आज रात्री.'

'अग पण असा कसा झाला अपघात? कुठे झाला? मला सगळ नीट सांग. मला तू काय सांगतेस ते कळतच नाही आणि शैलेशबरोबर अभयपण होता ना?' महेश ने विचारले. अभयला काहीच झालं नाही रे. पण शैलेश !... पूनमला खरच काहीही सांगायला सुचत नव्हतं. पुन्हा पुन्हा प्रश्न विचारल्यानंतर मनिषला आकलन झाले की मीराकाकूंचा म्हणजेच वर्तकांचा शैलेश आणि विद्यावहिनींचा मुलगा अभय हे दोघे मित्र अभयच्या बाईकवरून पनवेलला टेबल टेनिस टूर्नामेंटला हजर राहून पुण्याला परत येत होते. हायवेवर एका भरधाव ट्रकनी त्या दोघांना उडवले. अपघातात शैलेश जागीच ठार झाला आणि त्यांच्याबरोबर असलेल्या विद्यावहिनींच्या मुलाला म्हणजेच अभयला किरकोळ दुखापत झाली. पण जबरदस्त मानसिक धक्का बसलाय. अगदी फोनवर बोलण्याच्या अवस्थेततही तो नाहीये. अभयच्याच मोबाईलवरून हायवे पोलिसांनी वर्तकांकडे आणि विद्यावहिनींकडे बातमी दिली होती.

ओले कपडे करे बसे बदलून मनिष उलट्या पावली घटनास्थळाकडे जायला निघाला पुन्हा एकदा पत्ता नीट समजावून घ्यावा म्हणून तो पूनम बरोबर वर्तकांच्या घरी गेला. तेव्हा तिथले दृश्य बघून आतही जायची त्याची हिम्मत झाली नाही. बाहेरच्या बाहेर तो तिथून निघाला. पूनम आत शिरली. शैलेशच्या आजी अजूनही लटलट कापत होत्या. शैलेश ची आई म्हणजे मीराकाकू तर बेशुद्धच होत्या. डॉक्टरत्यांच्या जवळच बसून होते. शुद्धीवर आल्या की पुन्हा रडून आकांत करून पुन्हा पुन्हा त्यांची शुद्ध हरपत होती. मगाच्या हलकल्लोळात भर पडली होती ती नेहाच्या रडण्याची. नेहा म्हणजे शैलेश ची बहीण नुकतीच आपल्या आठ-नऊ महिन्याच्या बाळाला घेऊन आली होती बातमी कळल्यावर. आईची अशी अवस्था बघून ती पार गोंधळून गेली होती. तीही हमसा हमशी रडत होती. आणि या गर्दीमध्ये तिचे बाळही घाबरून टाहो फोडत होते. एकच गोंधळ माजला होता. सोसायटीतले झाडून सगळे जमले होते. घर नुसते खचाखच भरले होते. तिन्ही सांजेच्या करकरीत वेळी हा कोलाहलान घरातला आणखीनच अंधार दाटला होता.

पूनम बरोबरच फोन लावण्यासाठी म्हणून परत गेलेल्या विद्यावहिनी घरात शिरल्या आणि त्यांनीच हॉलमधल्या लाईट चे बटन दाबले. त्यांनी एका कोपऱ्यात बसून थरथरणाऱ्या वर्तक आजीना स्वयपाकघरातून पाणी आणून दिले. आणि त्या म्हणाल्या, 'आजी तुम्ही शांत व्हा बघू आधी. काही होत नाही आहे.' एवढ्यात त्यांचे नेहाकडे लक्ष गेले. भोकाड पसरलेल्या तिच्या बाळाला त्यांनी स्वत;कडे घेतले व त्याला शांत करता करता बाल्कनीत उभ्या असलेल्या मुलींकडे नेऊन दिले. नेहालाही पुढे घालून आत बेडरूममध्ये तिच्या आईजवळ नेऊन बसवले. परिस्थिती थोडीशी सावरल्यासारखी वाटल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम तिथे जमलेल्या बाळगोपाळांना बाहेर काढले. एवढच करून त्या थांबल्या नाहीत. सोसायटीतल्या इतर बायकांना इशारा करून त्यांनी बाहेर बोलावले. सगळ्या बायका बाहेर आल्यावर त्या म्हणाल्या, तुम्ही आता माझं ऐकायचं पटकन आपल्या घरी जाऊन मुलांना काहीतरी खायला द्या. वाटल्यास पुन्हा परत या. पण विद्यावहिनी असं कसं जायचं? वाटकरे बाई वहिनींना विरोध करत म्हणाल्या, 'मी म्हणते ते ऐका. आपण मोठी माणस उपाशी राहू शकतो. पण लहान मुलांचं काय.?' 'पण मला थांबायला काय हरकत आहे?' टेकवडे काकूंनी विचारले. त्यावर विद्या वहिनी म्हणाल्या, काकू, पण पायऱ्या निसरड्या झाल्यात पावसानं. तशातच तुमचे आबा जिन्यावरून खाली यायला निघालेत. पाय वगैरे घसरायचा एखादवेळेस आंधी जाऊन बघा त्यांना. विद्यावाहीनीच्या दटावणीवरून घरी गेलेले महिलामंडळ अर्धा एक तासातच परत आले. घरी कुणाचच लक्ष लागत नव्हतं. एक मोठे कुटुंब असलेल्या या सोसायटीत शैलेश व अभय याची जोडी सदैव एकत्र बागडत असायची. आज सकाळी

सोसायटीच्या वॉकिंग ट्रॅक वर फिरणाऱ्या अनेकांनी त्या दोघांना हसत खेळत बाय बाय सी यु करत बाईक वरून बाहेर जाताना पहिले होते. अन संध्याकाळी तर अशी बातमी. या गोष्टीवर त्यांचा विश्वासच बसेना. एक एक करून सगळ्या बायका पुन्हा घोळका करून बसल्या. तेवढ्यात डॉक्टर आतून बॅग घेऊन बाहेर आले. जाता जाता आजी शेजारी असलेल्या विद्यावहिनींना म्हणाले, त्यांना झोपेची अर्धी गोळी दिली आहे जबरदस्ती. निघतोय मी. तसच काही वाटलं तर फोन करा. डॉक्टरांच्या मागोमाग नेहापण आतून बाहेर आली. व पुन्हा आजीच्या गळ्यात पडून मुसमुसून रडू लागली. आजीही पुन्हा रडायला लागल्या. तिला आजीपासून दूर करत विद्यावहिनी म्हणाल्या. नेहा अगं रडण थांबवायचं. बाळाला घे बघू जरा. भूक लागली असेल. बाहेर बाल्कनीत उभ्या असलेल्या मुलींकडून बाळाला आणून त्यांनी तिच्या मांडीवर ठेवले. आई जवळ येताच बाळ पण रडायचे थांबले. आपसूकच नेहाची बोटे बाळाच्या जावळात फिरू लागली. नेहा शांत झाल्यानंतर थोड्या वेळानी विद्यावहिनीनी तिच्याच कडून तिच्या जवळच्या नातेवाईकांचे फोन नंबर घेतले. आत जाऊन स्वत:च फोन वर सगळ्याना निरोप दिले. अपघात झालाय पुढचं काय माहित नाहीये. काळजी करू नका. असा मोघमच निरोप दिला. वेळ जाता जात नव्हती. पुन्हा विद्यावाहिनीनी शेजारच्या शहा भाभींना नजरेनेच खुणावले. इशाऱ्याबरोबर शहाभाभी जमिनीला हाताचा रेटा देत देत उठल्या. परत आल्या तेव्हा त्यांच्या हातात चहाच्या दोन कपबश्या होत्या. विद्यावहीनींनी आजीना एखाद्या लहान मुलाला पाजवावा तसं बशीतून घोट घोट चहा पाजवला. मग त्या डोळे मिटून भिंतीला डोके टेकून बसलेल्या नेहाकडे वळल्या. तिला जागं करून तिच्याही हातात चहाचा कप दिला. तिने तो हाताने झिडकारला. तसा रागवून विद्यावहिनी म्हणाल्या, 'अगं अगं सांडेल लेकराच्या अंगावर. बाळाची आई आहेस ना गप्प पणे पी. नाहीतर आजीसारखं बशीन पाजविन बघ.' बाल्कनीमध्ये बसलेल्या मुलीही घरी जायला निघाल्या तेव्हा त्यांना लहान मुलांकडे लक्ष द्या असं बजावायला विद्यावहिनी विसरल्या नाहीत. तेवढ्यात कोंडेकर मावशींची सून रतन येऊन विद्यावहिनींना म्हणाली, विद्यावहिनी तुमच्या घरात फोनची रिंग सारखी वाजतेय बघा. एवढ्यातल्या एवढ्यात चार पाच वेळा वाजली म्हणून तुम्हाला सांगायला आले. हे ऐकून विद्यावहिनी चटकन उठल्या. म्हणाल्या, 'होय अगं, मगाशी पण फोनची रींग वाजत होती म्हणून दोन जिने चढून वर गेले. कुलूप काढून दार उघडेपर्यंत रिंग बंद झाली. कोण फोन करतय कोणास ठाऊक? जाऊनच येते. त्याशिवाय चैन पडणार नाही. आणि नेहा बाळ झोपलंय मांडीवर. अशी ताठत किती वेळ बसणार. आत जाऊन झोपव त्याला नीट.' विद्यावहिनी गेल्यावर पुन्हा शांतता पसरली.

एवढ्या एकत्र बायका पण नेहमीचा कलकलाट नव्हता. नेहा बाळाला घेऊन आत गेल्यानंतर बायका जरा हात पाय पसरून बसल्या. हळूहळू कुजबुजत आजच्या अपघाताविषयी, इतर अशाच दुर्घटनाविषयी अचानक आलेल्या पावसाविषयी दबक्या आवाजात बोलू लागल्या. तोंडाला कुलूप लावून किती वेळ बसणार? मुली केव्हाच्या अभय ला फोन लावायचा प्रयत्न करतायत. पण त्याचा मोबाईल स्विच ऑफ आहे. आता विद्यावहिनी गेल्यात बघूया काय होतंय ते. शेवटी कितीही झालं तरी आईचं काळीज ते जीव थाऱ्यावर नसेल बिचारीचा. पण तरीसुद्धा खूपच धीराची बाई आहे ती. एवढा मोठा प्रसंग तरी किती खंबीरपणे निभावून नेते आहे., शहा भाभी म्हणाल्या. अभयची काय अवस्था झाली असेल. मी जर विद्यावहीनींच्या जागी असते तर प्रत्यक्ष पोरगा हातीपायी धड असलेला बघेपर्यंत माझी तर दातखिळी उतरलीसुद्धा नसती. बबलूची आई उद्गारली. तर काय? मीरावाहिनीचंच बघ ना. पहिला ॲक्सिडंटचा फोन शैलेशच्या बाबांनी घेतला. आणि ते आणि प्रधान काका जायला निघेपर्यंत दुसरा फोन आला. मीराकाकूंनी फोनवरचं पूर्ण बोलण ऐकण्याच्या अगोदरच आकांत मांडला. त्या शुद्धीवर आल्या ही पण बोलण्याच्या मनस्थितीत नव्हत्या. फोन अभयच्या मोबाईलवरूनच आला होता म्हणून विद्यावहिनी परत फोन तरी करू शकल्या. आणि मग खरं काय ते पोलिसांकडून समजलं. पोलिस म्हणाला, ते दुसरं पोरगं म्हणजे अभय सुंद होऊन बसलय. काय बी बोलना झालय. त्यावर विद्यावहिनी म्हणाल्या, 'हा अहो त्याचीच आई बोलतेय. पण अभय ला काही नाही ना लागलेलं.' तर पोलिस म्हणाला, अजिबात नाही. 'आम्हाला तर काहीच सुचेना. डॉक्टरांना कोणी फोन केला काय माहित. कोंडुसकर आजींनी विचारले. अहो दुसरं कोण करणार. विद्यावहिनीनीच केला असेल. बबलूला मीच धाडलं होतं त्यांच्याकडे.' बबलूची आई म्हणाली. 'विद्यावहिनींनी प्रसंगावधान राखलं बाई. नाहीतर आपण. नुसते हातपाय गाळून बसलो असतो. रतन बोलली. आणि त्यांच्या नातेवाईकांना फोन करायचा तर आमच्या डोक्यात सुद्धा नव्हतं. विद्यावहिनींना बर बाई सुचलं. नाहीतर पुरुष मंडळी येईपर्यंत आपण आपले गपच बसलो असतो. नेहाला सुद्धा निरोप मिळाला नसता.' शोभा म्हणाली. 'खरच नेहाला करसं सामोरं जायचं हे आम्हाला कळेना. तिच्या कडेवरच बाळ पुढं होऊन घ्यावं हे ही उमजेना.' रतन म्हणाली. ही लग्न होऊन या सोसायटीत येऊन उणेपुरे दोनच महिने झाले होते. पण या दोनच महिन्यात विद्यावहिनीची खंबीरपणाची झलक तिला प्रत्यक्ष पाहायला मिळाली. वेळेवर धावून मदत करण्याची वृत्ती याबद्दल तिला तिच्या घरच्या व दारच्या लोकांकडून सतत ऐकायला मिळत होते. सोसायटीत क्रिकेट खेळणारी मुले, वॉचमन, बांधकाम करणारा माळी या सगळ्यांवर त्यांचा असलेला वचक हा रतनचा कौतुकाचा विषय होता. विद्यावहिनीनी हटकले की वॉचमन कसा त.. त.. प.. प.. हे तिने प्रत्यक्ष दोनचारदा बघितले होते. सोसायटीतल्या प्रत्येकाला या ना त्या कारणाने त्यांचा खंबीर आधार घेण्याची वेळ कधी ना कधी आली होती. याचे ही किस्से तिने तिच्या सासूबाईंकडून बऱ्याचदा ऐकले होते. म्हणून हिंदी बोलणाऱ्या वॉचमन पासून, इस्त्री, भाजीवाल्यांच्या त्या विद्या भाभी आणि अख्या सोसायटीच्या त्या विद्यावहिनी झाल्या होत्या.

एकाच औद्योगिक संस्थेच्या कर्मचार्यांची सोसायटी असली तरी व्यक्तीभेद कितीही होऊ दे सुरुवात सुरुवातीला स्वस्वभावाला

# रांगोळी डिझाईन्स

सौ. शुभदा राहुल लाड
११४६०३७५३३













# रांगोळी डिझाईन्स

सौ. शुभदा राहुल लाड
९१४६०३७५३३







अनुसरून कित्येकजणींनी वहिनींचे नेतृत्व झुगारायचे प्रयत्न केले होते. हे तिच्या कानावर ही आले होते पण अखेरीस सर्वांनाच विद्यावहिनींचे खंबीर नेतृत्व मनातून का होईना मान्य करावे लागले होते. या सर्व पार्श्वभूमीवर वहिनींविषयीचा आदर दाखवून रतन म्हणाली, 'सगळ्यांनीच हातपाय गाळून करसं चालेल? विद्यावहिनींचा आदर्श आपणही घ्यायला पाहिजे. स्वत:ची काळजी बाजूला ठेऊन आज त्या दुसऱ्याला आधार देत आहेत.' या बोलण्यावर उसासा टाकून कोंडेकर मावशी म्हणाल्या, 'खरच विद्यावहिनींसारखी धीराची बाई मी तर दूसरी कोणी कधी बघितली नाही. आज मी तिला १५ वर्ष पाहात आहे. या आपल्या इमारतीचे बांधकाम कंत्राटदाराने रखडवले होते. त्यांना जाब विचारणारे कुटुंब विद्यावाहीनींचेच होते. अगदी लाईटपाण्याचे कनेक्शन नसताना विद्यावहिनींच्या मिस्टरांनी इथे येऊन राहण्याची तयारी दाखवली होती. त्याच्यानंतर मग आम्ही आलो विद्यावाहीनींचेच लग्न होऊन अमेरिकेला गेलेली आरती आणि आमचा राजू तेव्हा बरोबरच खेळायचे आणि मावशी तुम्हाला आठवतय का? आपल्या सोसायटीच्या मागे प्लास्टिकच्या वस्तू तयार करण्याचा कारखाना झाला होता. त्या कारखान्यातून पडणाऱ्या धुराने आपल्याला किती त्रास व्हायचा. तेव्हा विद्यावाहिनीच आपल्या बायकांचं शिष्टमंडळ घेऊन मोठ्या अधिकाऱ्यांना जाऊन भेटल्या होत्या. एकदा नाही अनेकदा हेलपाटा घालावे लागले होते. पण कारखाना तिथून हलवून दुसरीकडे नेल्याशिवाय विद्यावहिनी गप्प बसल्याशिवाय राहिल्या नाहीत.' शहा भाभी म्हणाल्या. 'न आठवायला काय झालय, त्यानंतर आपल्या गेटसमोरची पानटपरी कशी बंद करायला लावली त्यांनी.

तिुल्या टवाळखोरांचा बंदोबस्त करण्यास विद्यावाहीनींनी घेतलेला पुढाकारसुद्धा माझ्या चांगलाच लक्षात आहे. कोंडेकर मावशी म्हणाल्या. 'पण त्या सगळ्या गोष्टी ठिक आहेत हो. मला आश्चर्य वाटतेय ते आजच्या प्रसंगाचं. स्वत:च्या मुलाला अभयला अपघात झालाय त्याला किती आणि काय लागलय याचं काय कमी टेन्शन असेल का त्यांना तरी केवढ्या खंबीरपणे त्या प्रसंगाला सामोऱ्या गेल्या. येथे येऊन वर्तकांच्या घराला सावरायला धडपडतायत.' कोणाला म्हणून कधीही चांगलं न म्हणणाऱ्या नीलावहिनी या विहिनीचे गोडवे गाताना सगळ्यांनीच पहिल्यांदा ऐकले होते. विद्यावाहीनींचे धीरोदात्त खंबीर नेतृत्व पुन्हा एकवार सगळ्यांच्या मनावर अधोरेखित झालं होतं.

बाहेर पावसाचा जोर आणखीनच वाढला. तेवढ्यात नेहाचे बाळ अर्धवट झोपेतून किंचाळून उठलं. ते काही केल्या थांबेना. सगळी बिल्डींग दणाणून टाकली. मग त्या आवाजाने विद्यावहिनी खाली परत आल्या नाही तरच नवल.त्याला शांत करण्यामध्ये अर्धा तास गेला. रात्रीचे बारा वाजून गेले होते. कोंडेकर मावशींनाच फक्त सोबत ठेऊन विद्यावहिनींनी बाकी सगळ्या बायकांना घरी जाण्यास निक्षून सांगितलं.

जेमतेम उजाडलं असेल नसेल. पाऊसही थांबला होता. त्याचवेळी महिला मंडळ सकाळी पुन्हा एक एक करून आले. अपुरी झोप,



’$mQ>mJm’$s : ¶mJe H$ma
9373069265



अस्वस्थता त्यांच्या चेहऱ्यावर जाणवतच होती. इकडे वर्तकांचे नातेवाईक येण्यास पहाटेपासूनच सुरुवात झाली होती. हॉल पुन्हा एकदा भरु लागला होता. मीरावहिनी भकास चेहऱ्याने शून्यात टक लावून बसल्या होत्या. त्यांचा चेहरा बघून काळजात चर्र होत होतं. आजी हॉलमध्येच जपमाळ घेऊन भिंतीला टेकून बसल्या होत्या. पण माळेतला एकही मणी सरकत नव्हता. नेहा बाहेर कुठं दिसत नव्हती. पण स्वयपाक घरात तिच्या बाळाला दोन पायावर घेऊन वाटीचमच्याने दुध पाजणाऱ्या विद्यावहिनींच्या चेहऱ्यावरून स्पष्ट कळत होते की त्या एक क्षणभरही झोपल्या नसाव्यात. तेवढ्यात शैलेशची नगरची आत्या घरात शिरली ती हंबरडा फोडतच. नेहा तीरासारखी आतून बाहेर येत आत्याच्या गळ्यात पडली. पुन्हा एकदा हलकल्लोळ माजला. सोसायटीत येणारे जाणारे, दुधवाले, पेपरवाले, झाडलोट करणारे खाली रस्त्यावर घोळक्याने थांबून आपापसात कुजबुजत होते. आता तर लोक गर्दी करून जिन्यातच उभे होते. या सगळ्या कोलाहलात अम्ब्युलंस आली!!! ... अम्ब्युलंस आली!!! अशी कुजबुज उठली. सगळ्या बायका बाल्कनीतून बाहेर बघू लागल्या. वॉचमन सोसायटीचे मेन गेट अम्ब्युलंस आत घेण्यासाठी पूर्ण उघडताना त्यांना दिसला. सगळे जण जिन्याकडे वळले.

आत इतका वेळ सुन्न होऊन बसलेल्या मीराकाकूही धावत सुटल्या. अहो अहो करत त्यांच्या मागोमाग विद्यावहिनी खाली गेल्या. त्यांनाही धक्का देत नेहा आणि इतर बायका खाली आल्या. या गदारोळात आजींना जिना उतरायचे ही कळेना. नुसत्या लटपट कापत तो पर्यंत अम्ब्युलंस बिल्डींगसमोरच्या मोकळ्या जागेत येऊन थांबली. वरचा लाल दिवा पेटलेलाच होता. मिराकाकू मुसंडी मारून पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागल्या. त्यांना धरून ठेवलेल्या बायकांच्या हाताला हिसडा देऊ लागल्या. तशा विद्यावहिनी पुढे होऊन मिराकाकुंना दोन्ही हाताच्या कवेत घट्ट धरतच पुढे सरकू लागल्या. गाडीचा दरवाजा खाडकन उघडला. ड्रायव्हर शेजारच्या सीटवरून मीराकाकुंचे मिस्टर म्हणजेच वर्तककाका उतरले. मागील दरवाजा उघडला. तसे सगळेच धडधडत्या उराने नजर रोखून पाहू लागल्या. आधी सोसायटीतील मुले उतरली. स्ट्रेचर गाडीतून खाली उतरवू लागली. स्ट्रेचरवरती झाकलेली पांढरी चादर नजरेला पडताच रडण्याचा एकच कल्लोळ उठला. स्ट्रेचरमागोमाग विद्यावहिनींचे मिस्टर म्हणजेच अभयचे बाबा खाली उतरले.

आणि..... आणि........ सगळ्यात शेवटी उतरणाऱ्या व्यक्तीवर सगळ्यांचे डोळे खिळले. आणि खिळूनच राहिले. गाडीच्या उघडलेल्या दारामुळे अगोदर फक्त पायच दिसत होते. नंतर अम्ब्युलंसचे दार बंद झाल्यावर सगळ्यांच्या नजरेला पडला तो प्रत्यक्ष वर्तकांचा मीराकाकूचा शैलेश. डोक्याला पट्टी, हात गळ्यात अडकवलेला. नजर जमिनीला खिळलेला शैलेश. हो शैलेशच म्हणजे? मग पांढऱ्याचादरीआडचा तो कोण? हे जाणण्यासाठी काही सेकंदाचा अवधी लागला असेल नसेल.... लोकांच्या डोळ्यांवर विश्वास बसायला आणि धाडकन कोसळण्याचा आवाज यायला एकच गाठ पडली. विद्या अभयच्या बाबांचा तो आक्रोश. विद्यावहिनी.. विद्यावहिनी.... बायका ओरडल्या.

.... पण कोसळलेल्या विद्यावहिनी तो कोणाचाच आक्रोश ऐकण्यापलीकडे पोहोचल्या होत्या.



# लहानांसाठी

✻ या चौकोनात काही फुले, फळे, भाज्या व रंग यांची नावे लपलेली आहेत. त्यांना शोधून रंगीत पेन्सिल ने गोल करा.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २. जू | ३. गा | ४. स | ५. म | ६. ई | ७. शे | ८. पू | ९. ड | १०. आं |
| ११. का | १२. ना | १३. ज | १४. | १५. जा | १६. के | १७. व | १८. डा | | २०. बा |
| २१. र | २२. क | २३. र | २४. वं | २५. द | २६. त | २७. गा | २८. ळीं | | |
| ३१. ले | ३२. व | ३३. डी | ३४. ख | | ३६. की | ३७. फु | ३८. ब | | |
| | ४२. ठ | | | | ४६. पा | ४७. ल | ४८. क | | |
| | | | ५४. का | ५५. मु | ५६. ग | ५७. को | ५८. ज | ५९. र्दा | ६०. ळू |
| | | ६३. जां | ६४. भ | ६५. ळा | | ६७. बी | ६८. ट | | |
| ७१. सु | ७२. क | ७३. भू | | ७५. प | ७६. व | ७७. | ७८. सी | | ८०. बो |
| ८१. दो | ८२. र | ८३. ख | ८४. | ८५. भो | ८६. | ८७. आ | ८८. ता | ८९. के | ९०. र |
| | ९२. ड | ९३. ण | ९४. मो | ९५. ग | ९६. रा | ९७. म | ९८. फ | ९९. ळ | |
| | १०२. ई | १०३. का | १०४. सं | १०५. त्रे | १०६. त | १०७. का | १०८. ख | १०९. ड | ११०. फ |
| | | | ११४. बी | | ११६. रा | ११७. ळू | ११८. क्रो | | १२०. ण |
| १२१. ला | १२२. ल | १२३ .सू | १२४. ण | १२५. | १२६. णी | १२७. अ | १२८. न | १२९. न | १३०. स |



फोटोग्राफी : योगेश गुरव  (९८६०८१५५७८)





# माझे वडील

सुषमा र. गोखले
१३७२५७०६०८६

hm{df¶ Smù¶mg ‘ma Amb Am{U AmnU {b{hb nm{hO Ag VrdVZ dm©b. ‘mP dS>rb eH$aand AdYV nmR>H$, Ë¶mZm Amåhr H$mH$m åhUV Ag. Va H$mH$m A{Ve¶ à‘i, ‘X, {MH$m©r AgUma H$Zdmi, göX¶ {nVm hmV. H$mH$mM {ejU E‘.E. ~rES>. ~meuVrb gbm I hm¶ñH$b ‘Ü¶ V {ejH$ åhUZ ZmH$ar H$aV hmV. AmB dS>rb XmKhr ZmH$ar H$aUma. nU gmV ^mdS> ! Ë¶m‘i I mD$Z{nD$Z g I r Agbm Var g I dñV OrdZ OJUma ZìhVm. gdgm‘mÝ¶ ‘Ü¶‘dJu¶ H$Q>~mà‘mU EH$m bhmZ JndmV Amåhr dmT>bm. nU H$bm, gm{hË¶, gñH$Vr ¶mMr nana Ir‘Vr Amåhmbm Ë¶mÀ¶m‘i {‘ i mbr.

ñH$mba{enbm~gdU Agm, d°$Ëd ñnYV, ZmQ>çN>Q>V, ZmMmV ^mJ KU Agm, {Z~YñnYV ^mJ KU Agm gJù¶mbm gH$s¶ àmËgmhZ, nU Sm i g. Ë¶mZr Amåhmbm ^mfU qH$dm {Z~Y ñdV: {bhZ {Xbm Zmhr. AmåhmbmM {bhm¶bm bmdbm. ñdV: MmJb gm{hË¶H$ d°$ AgZhr.

KaMVbr gd H$m‘, ZmH$ar ¶m‘i AmB amÌr X‘Z Pmnm¶Mr. Vìhm H$Umbm ~a Zgb Va H$mH$m CR>Z Amåhmbm H$m¶ hd ZH$m V ~Km¶M. V Jmïr gmJm¶M, {’$am¶bm Ý¶m¶M. gm{hË¶ dmMZmMr JmS>r Amåhmbm Ë¶mÀ¶m‘i M bmJbr. V CÎm‘ {ejH$ hmV. qhXr aËZ narjV ^maVmV àW‘ Amb hmV. gmå¶ eìV, d {eH${dÊ¶mMr MmJbr AmñWm hmVr.

~r. E. bm BH$mZm{‘Šg ‘Ü¶ ‘r n{hbr Amb nU ’$ñQ>Šbmg WmS>Š¶mV MH$bm. E‘.E. H$am¶Mr ‘bm Vrd BÀN>m hmVr nU ñH$mba{en {‘ i mbr Zmhr Va EdT>m I M H$gm PnUma? åhUZ ‘r H$mhr ~mbb Zmhr nU In aS> ¶m¶M. H$mH$mZr ‘mPr AdñWm ~{KVbr d E‘.E. bm nmR>dm¶M R>a{db. AmBMm hr ^¸$‘ nmR>t~m hmVm. Ë¶mM {def åhUO gmbmna Odi AgZhr H$mëhmna {dÚmnrR> Amh {VW V E‘.E. H$a åhUZ ‘bm nmR>{db. ZVa bmZ, ñH$mba{en{‘ i mbr WmS>m hmV^a bmJbm h dJ i .

nÝhm~meuV ~r.ES>. H$b. gmJbrbm Ë¶mZVa bJM ZmH$ar {‘ i mbr. nJma gé Pmë¶mda Ë¶mZm Am{WH$ VgXr {Xbr Zmhr nU Ë¶mMm ‘mZ{gH$ AmYma dimdir dmQ>V am{hbm. Ë¶mÀ¶mgmR>r, KamVë¶mgmR>r H$mhr dñV ¿¶mì¶mV Ë¶mM H$mVH$ H$ard hr Am‘Mhr ^mdZm am{hbr.

gXdmZ gmga ggñH$V, MmJb {‘ i mb. XmÝhrH$S>Z H$mVH$ à‘ XmÝhr {‘ i mb. H$mhr H$maUm {Z{‘ÎmmZ V Am‘À¶mH$S> amhmV. Amåhr Ë¶mÀ¶mgmR>r H$m¶ H$aVm ¶Bb V H$am¶Mm à¶ËZ H$ê$V. ‘br~am~a OmdBhr bmS>H$ Pmb.

d¶naËd Vã~V CVê$ bmJbr. EH$Xm gmJbrbm Amb AgVmZm Ë¶mZm Sm¶~Q>rg {S>Q>ŠQ> Pmbm. H$S>H$ nÏ¶mnmUr H$ê$Z H$m i Or KD$Z Vm AmQ>mŠ¶mV AmUbm. nU ZVa H$mhr dfmZr Ë¶mZm n j mKmVMm gmå¶ PQ>H$m Amb. Vã~V I mbmdV Jbr. earaM hmb Pmb. Vìhm ‘mÌ ZmH$ar, ‘bmM {ejU, KaÀ¶m O~m~Xmè¶m ¶m‘i Ë¶mMr gdm H$aU O‘b Zmhr ¶mMm I X dmQ>Vm. nU AmB, ^mD$ d{hZr ¶mZr gdV AVa nS> {Xb Zmhr.

edQ>r ^Q>m¶bm Jb Vìhm ~mUmÀ¶m eæ¶da nS>bë¶m ^rî‘mMm¶mMr AmR>dU Pmbr. ‘Z ga^a Pmb. Aghm¶ {ddb Aer Ë¶mMr AdñWm ~KZ Ë¶mMr bdH$a gQ>H$m ìhmdr Aer àmWZm H$br. Am{U ~am~a ‘{hZm XrS> ‘{hÝ¶mV Ë¶mMr àmUÁ¶mV ‘mbdbr. AmVm Xdm~am~a amO Ë¶mMrhr àmWZm H$aV AmerdmX ‘mJV.

"‘V ‘mA‘VJ‘¶'hË¶mÀ¶m~m~VrV AJXr Ia Amh.





# बाबा

शर्वरी रमेश गोखले
९७६४५४८५८१



नियतीचा खेळ सारा कुणी मांडला हा संसार सारा
अघटीत अकल्पित घडले सारे
दिशा बदलून वाहू लागले वारे
का, कधी, कसे कुठे अचानक घडले सारे
ध्यानी मनी नसताना लाटांपासून दूर झाले किनारे
अचानक एक क्षण होत्याचे नव्हते झाले
आणि आठवणींसाठी मात्र अख्ख आकाश उरले
मनात माजतो एक हलकल्लोळ
ओलेचिंब होतात आठवणींचे सारे क्षण
होता तेव्हा आसपास सुगंधासारखे दरवळत होता
कालरूपी अमृताने सर्वांना मोहरवत होता
आमच्या आयुष्यातील सुगंध अचानक नाहीसा झालाय
आठवणींच्या कुपीत मात्र अजून तसाच तरळत राहिलाय
कोणाची चूक कोण गुन्हेगार आम्ही मात्र निरुत्तर लाचार
माणसाच्या आयुष्याचे का काहीच नाही मोल येथे ?
गेलेला आमचा माणूस आम्हाला परत मिळणार नाही
बाबा आठवण तुमची आम्हाला आयुष्यभर येत राहील
माहीत आहे आम्हाला तुम्ही आहात आसपास
नसाल तुम्ही जगासाठी पण आहात आमच्या आत
दरवळत रहाल मनामध्ये आयुष्यभर बनून सुवास



फोटोग्राफी : योगेश गुरव (९८६०८१५५७८)





# शब्दांजली


रोहीत माने
९१७५५८२५७४


## पहिली भेट

वळवाच्या अचानक बरसणाऱ्या सरींसारखी
तू माझ्या आयुष्यात आलीस
नकळत माझ्या इवल्याश्या जगाचा
एक भाग बनून गेलीस,
पावसानंतर बहरणाऱ्या सुगंधाप्रमाणे
माझ्या मनात भरलीस
मनामधून या हृदयात
हळूहळू उतरत राहिलास
ती पहिली वहिली भेट
मला अजून आठवते
प्रत्येक आठवणीत
प्रेमाचा नवा खुलासा करून देते.

## पाऊस

पाऊल पडता तुझे या अंगणा
चाहूल लागते माझीया मना
साद घालतो हा वेडसर वारा
संगे त्यांच्या आसमंत सारा
घेऊनी येतो सोबती तुझा सुगंध
नाचू लागते मन होऊन बेधुंद
आरंभ झाला श्रावण मासाचा
आनंद लुटा या धुंद पावसाचा
पिसारा फुलवुनी मोर बागडे
बोले, सूर लावूनी चातका साथ दे
चिंब होती वाटा, नद्या अन दऱ्या
वाहू लागती नव्या धुंदीत खऱ्या
बहरून जाती वेली, पाने अन फुले
वेड लावतो हा निसर्ग मले...

## तिची माझी ओळख

तिची माझी ओळख
नजरेवाटे खुलून आली होती
नयनातील त्या मृदू शब्दांना
गालावरील खळीची साथ मिळाली होती
तिची माझी ओळख
प्रात:कालच्या शीत वायु सोबत झाली होती
मी स्तब्ध किनारा अन
जणू ती खट्याळ लाटच वाटत होती
तिची माझी ओळख
क्षणाक्षणाला वाढून येत होती
नकळत आमच्या मनाच्या
रेशीम गाठी जुळवून देत होती





# बाल संस्कार

सौ. कमल अ. जाधव
१७६५६३०१४२

मूल हे आईच्या गर्भात असल्यापासून त्याच्यावर संस्कार होत असतात. मूल जेव्हा जन्माला येते तेव्हा त्याला आईच्या स्पर्शाची जाणीव होते. तसेच मूल जसे माठे होईल तस तसे इतरांचे ऐकून पाहून आपली भाषा तयार करत असते. भोवतालच्या परिस्थितीचाही त्याच्यावर परिणाम होत असतो व त्यातून ही मूल काही तरी शिकत असते. हे शिक्षण सहजपणे मूलांना प्रथम त्यांच्या घरातूनच मिळत असते. त्यावेळचे त्याचे अनुभव, त्याचे विश्व हे आई व बाबा तसेच घरातील इतर व्यक्ती, घरातील वस्तू यांच्याशी निगडीत असते. घर ही त्यावेळी मुलांची पहिली शाळा तर आई ही त्याची पहिली शिक्षिका असते. मूल निरीक्षणातून, कृतीतून, प्रश्न विचारून घेत असते. चालणे, उठणे, खााऊ खाणे खेळण्याशी खेळणे मोठयाचे ऐकून बोलायला शिकणे तसेच या वयात मुले घरचे नातेवाईक, परिसरातील कुत्रा, मांजर, गाय यासारखे प्राणी चिमणी, कावळा, पोपट या सारखे पक्षी व त्यांचे आवाज ओळखायला लागते.

मूल जेव्हा ३ वर्षोचे होते तेव्हा ते बालकमंदिर मध्ये प्रवेश घेते. तेव्हा बालक मंदिर मध्ये सर्वागिण विकास होण्यासाठी त्यांचे आवडीचे खेळ, गाणी शिकवली जातात. बालकमंदिरमध्ये मुलांना अभ्यास (पुस्तकी) शिक्षण शिकण्याचे वय नसताना त्याचा आग्रह नको म्हणून लिहिणे वाचणे न करता फक्त त्यांची ओळख व्हावी बोलण्यातून, गाण्यातून भाषा समृध्द व्हावी तसेच गोष्टीतून समज यावी, खेळातून शरीराची वाढ व्हावी, मानसिक बुध्दीचा विकास व्हावा मित्रांच्या संगतीत राहण्याची वृत्ती वाढावी यासाठी बालकमंदीर निश्चितच उपयोगी पडते.

लहान वयात स्नायूचा विकास झपाटयाने होत नाही म्हणून संस्काराच्या दृष्टीने लिखानाला महत्व न देता मंत्र, स्तोत्र, हात जोडून प्रार्थना म्हणने ,ओळीत जाणे, चप्पल ओळीत लावणे स्थिर बसणे अशा उपक्रमामुळे मुले स्थिर होतात.

तसेच काही उपक्रम

१. जीवन व्यवहार - कापसाच्या वाती तयार करणे, दुर्वा निवडणे, रूमालाची घडी घालणे, मोठयांचा आदर करणे, वाकून नमस्कार करणे, . इ.

२. इंद्रिय शिक्षण- एकसारखे आवाज ओळखणे, वासावरून वस्तू ओळखणे, ज्ञानेंद्रियांची ओळख.

३. हस्त व्यवसाय -कागदी पंखा करणे, भेंडीचे ठस्से काम करणे, एकत्रित केलेले धान्य वेगळे करणे, किल्ला तयार करणे.

४. शारिरीक शिक्षण किंवा मुक्त शिक्षण-सुक्ष्म व्यायाम, योगासने, खेळ ,मौदानी ,आंधळी कोंशिबीर, टाळया वाजवणे, कंबरेवर हात ठेऊन उडया मारणे असे खेळ खेळणे.

५. चित्रकला- गोल, गोलातून अंक काढणे, फुल काढणे, २ अंक काढून चिमणी काढणे, साधे चित्र रंगवणे.

६. सामान्य ज्ञान - फुलांची नांवे, फळांची नावे, प्राण्याची नावे, रंग, आकार, वस्तू मधील फरक अशा अनेक गोष्टी होतात. अशा प्रकारे बालकमंदीर मध्ये बालसंस्कारातून अनौपचारिक शिक्षण दिले जाते.

अशा बऱ्याच गोष्टी शिकून किंवा निरीक्षण करून मुल घरी येते, तेव्हा पालकांनी त्याचे कौतुक करणे महत्वाचे आहे. घरी आल्यावर आज काय काय शाळेत शिकवले. बाईनी गाणी कोणती शिकवली अशा गोष्टींची चर्चा करावी. त्याला बोलकं करण्यासाठी प्रोत्साहन करावे. नाहीतर आपलं कसं असतं, तू अभ्यास कर असं आपण मागे लागतो. या वयात त्याला बोलकं करणं, चांगले खाण्याच्या सवयी लावणे फार गरजेचे आहे. बालकांना सर्वच वस्तू खेळ म्हणून खेळू दया, त्याला बोलू दया या वयात तरी त्यांना मोकळेपणाने वावरू दया.

मोठेपणी आहेच तुमचे आमचे जीवन






नेहा मोहिते

७५५९११२४११












# पिकल्या पानाचा कोवळा देठ

सौ. योगिनी मोहन भोसले
७५८८२५५८५०

कालच एका व्हॉटसप ग्रुप वर एक व्हिडीओ पहिला. एका सायलेन्स शोर्ट फिल्मचा होता तो. रस्त्याकडेच्या एका जोगीतून एक फटका किडकिडीत रया गेलेला म्हातारा बाहेर पडतो. हायवे वरून चालत एका छोट्या ढाब्यावर येतो. मालकाकडे पाहत घड्याळाकडे नजर टाकतो. साडेअकरा. सकाळचे. तिथलाच एक लाल बँडवाला सर्कल कोट उचलतो. त्याबरोबरच एक मुन्स आर रेडी चा बोर्ड उचलून हाय वे ला रस्त्याकडेला येऊन उभा राहतो. भर उन्हात पाय बदलत बदलत घामाने निथळत पार संध्याकाळपर्यंत. तहानलेला, तिष्ठत. हायवे वरची काही वाहने धाब्याकडे येतात ही. बहुधा लॉकडाऊन मुळे गर्दी तशीही कमीच. त्यातच हे तिष्ठत उन्हाने निथळणे अंगावर येते. कार मधून जाताना एक छोटी त्याच्या हातावर एक छोटेसे चॉकलेट ठेवते. कट टू. वेळ संपली. मालक त्याच्याकडे पेपर वर गुंडाळलेले अन्न फेकल्यासारखे देतो. तो म्हातारा कोट उतरून पुन्हा जुगीकडे. तो आणि त्याची म्हातारी मांजरासह जेवतात आणलेलं. जेवण झाल्यावर परड्यात हात धुतल्यानंतर म्हातारा जवळच ते चॉकलेट म्हातारीच्या हातावर ठेवतो. तिचे वठलेले दंतविहीन हसू. ती त्याला त्यातला अर्धा तुकडा देते तोडून. त्याचे स्मित. द एंड. एक फिल्म संपली.

एक चालू डोक्यात असं असतं का खरच एवढ प्रेम आपल्या बायकोवर. त्या म्हाताऱ्याचसुद्धा. की उतारवयातील उपरती. आणि बायकोच ही नवऱ्यावर. वयाच्या या मुक्कामावर लग्न ही पक्क होतं का? म्हणजे इतक्या वर्षानंतर संसाराची ही तारेवरची कसरत जमायला लागली की आपल्याला. असं वाटू लागल्यानंतर लग्नाला चांगली २५ - ३० वर्षे ओलांडल्यानंतर. मुलांच्या आणि आईबापांच्या मध्ये पडत जाणारं वैश्विक अंतर म्हणजे मुलांचे विश्व वेगळे अन आई बापाचे वेगळे. मी म्हणून टिकले इथे किंवा पदरी पडलेलं निभावतोय इतकी वर्ष मी म्हणूनच. अशा मी शब्दावर अडकलेली कॅसेट आता जुनी झाली असते तेव्हा कदाचित. बचतगट, भिशी, कीटी पार्टीमध्ये होय आमच्या यांनी पाठींबा दिला म्हणून मी अमुक तमुक करू शकले. किंवा रिटायरमेंटच्या कार्यक्रमात माझ्या सौभाग्यवतीने घरच संभाळल म्हणून मी हे काम करू शकलो अशी उभयपक्षी कानाला कृतकृत्य का काय म्हणतात ते करणारी वाक्य बोलली ऐकली जाऊ लागत असतील. एव्हाना असंही आपल्या स्वत:च्या किंवा भावांच्या बहिणींच्या किंवा लेकी सुना जावई मंडळी, आपल्याच पाया पडून आशीर्वाद मागू लागले. त्या मुळे अंगावर मुठभर मास वाढून देण्याच्या न प्रयत्नात असलेलं आपण आणि सामाजिक वजन वाढल्याच्या आनंदात डुंबू लागत असलेले वाढदिवसाची ही थेरं तुम्ही करा पाहिजे तर मला नका ओढू त्यात असे म्हणणारे साहेब राव अप्पाराव किंवा जयवंतभाऊ माझ्या मुलाने मला गिफ्ट पाठवलंय बर्थ डे चम्हणून ऑनलाइन, किंवा माझ्या सुनेने बघा कसा मल्टीकेक केलाय घरी आणून दिलाय घरी आमचे हे फोटो आपल्या सिनियर सिटीझन ना किंवा हास्य क्लब च्या मित्रांना मोबाईलवर दाखवू लागले होते. किंवा तिरसटराव म्हणून पंचक्रोशीत ज्ञात असलेले बायकोला न घाबरणारे कोणी बाबूराव रात्री पावणे बाराला झोपायला जातात. बर्थडे च्या आदल्या दिवशी ते पण नुसत्या जाळीदार बनियन वर नव्हे तर चांगला सा शर्ट घालून. आणि मुलाबाळानी बारा वाजता उठवल्यावर काय रे बाबा हे तुमचं चांगली झोप लागली होती असं म्हणत मुलांच्या आग्रहाला बळी पडले असं दाखवत बर्थडे बॉय ची त्रिकोणी टोपी डोक्यावर घालून केक पण कापतात आणि मेणबत्ती ही. तिरसटकाकी सुद्धा कृतकृत्य की काय ते होत बघत राहतात. वर नातवाला आता काढलेले फोटो पाठव रे मला व्हॉटसप वर आताच. सकाळी उठत नाही तुम्ही दहा दहा वाजेपर्यंत असे बजावतात सुद्धा. त्यात सुवर्णाकाकी, विजूमावशी, जयश्रीवहिनीही पण असतात. त्याही मुलाने, मुलीने, भाचीने आग्रह केला म्हणून पंजाबी ड्रेस आधी थोडसं कोशिस होत पण नंतर मोर्निंग वॉक, भिशी, नातवंडा शाळेतून आणायला जाताना, सहलीला सर्रास वापयला सरसावलेले दिसतात. दोघांच्या संसाराचा मुरांबा इतक्या वर्षाच्या संसाराने मात्र मुरत चाललेला. कैरीचा आंबटपणा तळाला आणि साखरेचा गोडवा वर येत चाललेला. नवऱ्याच्या नातेवाईकांना तुमच्याकडचे लोक, तुमच्याकडचे लोक म्हणणाऱ्या बायका नवऱ्याच्या नातेवाईकाच्या व्हॉटसप ग्रुप वर अधिक अक्टीव्ह असतात नवऱ्यापेक्षा. आणि सकाळी सकाळी मैत्रिणीचा हॅपी अनिव्हर्सरी चा फोन आल्यावर आपलं बोलून झाल्यावर आहोंना पण देतात. पूर्वीसारखं बर सांगीन हं मी त्यांना तुझ्या शुभेच्छा असं म्हणायच्या केव्हाच थांबलेल्या असतात. मुलांच्या बाहेर जेवायच्या प्लानच्या सपोर्टर असलेल्या आणि हॉटेल बिटेल ला जेवायला जाणं हे आपल्यासारखं नाही हा हट्ट केव्हाच सोडून दिलेल्या काकू जेव्हा बाहेर बसलेल्या काकाकांना ऐकू जाईल

# टाकावू पासून टिकावू वस्तू
# (पायपुसणी, उशी व लोड चे कव्हर इ.)



सौ. उषा मोहिते
९५०३८७२१२१





संजीवनी भोसले
८२६२१४४४७५



तेवढ्यांदा मोठ्याने सुनेला म्हणतात नको गं बाई तुमचं ते चायनीज किंवा काय ते आम्हाला नाही बाई पचत या वयात. त्यापेक्षा गुजराती थाळी किंवा पंजाबी डीशेस असलेल्या एखादं हॉटेल बघ ना.  तेव्हा काकांना न जाण्याचं कारण सापडतच नाही. जेव्हा घरात दोघेच राहतात तेव्हा साग्रसंगीत घराच्या जेवणाची जपमाळ ओढणारे एखादे बाळूकाका काकूंना म्हणतात आज फिरायला जायच्या ऐवजी बागेतच जाऊया तिथून येतानाच भेळपुरी खाऊया. तुला आल्यावर ताप नको स्वयपाकाचा.  वाटलं तर डाळभात लाव कुकरमध्ये. असा हाफ वे तडजोडीचा मार्ग सुचवतात. तेव्हा काकूंच्या मनात घंटांचे रुणझुण वाजू लागलेले असते. बर संसाराच्या फर्स्ट इनिंग मध्ये घरकामात चमचासुद्धा न उचललेले गणूकाका  आता वारंवार किचनमध्ये लुडबुडत काय करू काय ग मदत म्हणत गणूकाकीला वात आणायला लागलेले. तर त्यांचे शेजारी आव्वाची भाजी सव्वा ला आणत बायकोला जुन्या हिंदी सिनेमासारखे बायकोला गजरा आणू लागले. वर उल्लेखलेले तिरसटराव गजरा नाहीच आणत अजून. पण कालच्या आजीनातींच्या संवादातून कळलेली सौ ची आवडती भाजी पुढच्या चौकात चांगली मिळते म्हणून एक दिवसाआड आणून बॅकलॉग भरू लागले होते. अनेक भाऊ काकू आण्णा संध्याकाळी फिरायला न जाता घरीच चालू असलेल्या सिरीयल केव्हा बघू लागले हे त्यांची त्यानांच कळू न लागले. अरे हे युट्यूब किंवा फेसबुक का काय माझ्या मोबाईल वर आहे का रे? असे विचारू लागले. एखाद्या रमाबाई किंवा ठमाबाई आईशी दादाशी वहिनीशी बोलण झाल्यावर बळेच म्हणतात, काय यांच्याशी बोलायचंय. आहेत की देऊ का त्यांना फोन. किंवा एखादे जगनराव आपल्या बहिणीला फोनवरच सुनावतात, 'नको हं छबडे या रविवारी पार्टी ठेऊ. हिची संकष्टी आहे बर का? दुसरा दिवस बघ.' आता सर्वच घराघरातून निदान संसाराच्या या टप्प्यापर्यंत सर्वच गुडी गुडी आलबेल किंवा आल इज वेल असं असेलच असं नाही म्हणा.  सब घोडे बारा टक्के असे थोडेच असतात. जीतेपनाची खोड मेल्याशिवाय सोडणारच नाही असे म्हणणारे टिकोजीराव पण बघायला मिळतात आणि मोडेन पण वाकणार नाही असा बाणा असणारी बयाबाई पण.

पण ओम शांति ओम मध्ये आपल्या शाहरुखखानच्या हो डायलॉग आहे ना बाबा पिक्चर सारखच आपल्या लाईफ मध्ये हैप्पी एंडिंग असणारं आणि जर  कोणाच्या लाईफ मध्ये आहे तसं ठिकवालं एंडिंग नसेल तर तो नक्कीच द एंड नसतो. पिक्चर अभी बाकी हे मेरे दोस्त असं म्हणायला काय हरकत आहे.

तर मूळ मुद्दा काय की साधारणपणे या मुक्कामापर्यंत तरी निदान खडखडणारे संसाराचे दोर सुरळीत होत जातात. बरं हे पतीपत्नीच्या नात्याच जमत जाणारं गुळपीठ पार रावापासून रंकापर्यंत सेमच असतं हं. वर उल्लेख केलेल्या शोर्टफिल्ममधल्या म्हाताऱ्यापासून टोप लेव्हलच्या श्रीमंतापर्यंत. एखादा हाय प्रोफाईल ओल्ड कपल मधला मिस्टर रिची रिच म्हणत असेल डार्लिंग आज इंटरनेट वर एक आर्टिकल होतं सव्हायकल पेज वर, एक जर्मनीतले डॉक्टर आहेत यावरचे मास्टर. पुढच्या बिझनेस मिटिंग ला चल माझ्या बरोबर, जाऊन येऊ त्यांच्याकडे. मिसेस रिचीरिच त्यांच्या मेड ला शेफ ला किंवा नोकराणीला झापत असेल, रबिश आज ब्रेकफास्ट मध्ये एवढे कार्बोहायड्रेड असलेला स्नॅक्स, तुला माहिती आहे ना, डायबेटीसला असले कार्बोहायड्रेट असलेला स्नॅक्स ब्लड सुगर वाढवतात सकाळीच इम्बलेंस करतात. मग फूल डे ट्रबल. ने आत आता हा ब्रेकफास्ट आणि प्रोटीन शेक आणि शुगर असलेला ऑर्गेनिक ऑरेंज ज्युस आण बघू. गो फास्ट. आणि तिकडे एखाद्या खेड्यात एखाद्या शारदा आजी पुरणपोळीचे तुकडे गुळवणीत शिजवून ठेवतच असेल  त्यांना चावत नाही ना अलीकडे म्हणून.. आणि कारभारणीपेक्षा जास्त वयस्कर झालेला एखादा शिरपा आज्जा आपल्या सुनेला म्हणत असेलच की, अगं चहा उतरून झाल्यावर डेचक्यात पाणी ठेव गरम करायला थोडीस. फुटलेल्या पायाच्या भेगांना तेव्हढच कमी झोंबत. येतच असेल बघ म्हातारी शेतातनं किंवा एखादा तालुक्यातला तुटपुंजा पगाराअभावी बायकोला कुठेही बाहेरगावी नेऊ न शकलेला एखादा शिपाई आपल्या थोडक्या फंड बचतीच्या पैशातून थोडं बाजूला ठेवून बायकोला चारी धाम यात्रा घडवून आणण्याचे स्वप्न उराशी बाळगून असेलच की. पु. ल. देशपांडे यांच्या सुप्रसिद्ध अशा व्यक्ती आणि वल्ली या पुस्तकात अंतु बर्वा ही व्यक्तिरेखा रेखाटताना शेवटास म्हणतात, कोकणातली ही माणसं पिकल्या फणसासारखी असतात. खूप पिकल्याशिवाय त्यात गोडवा नाही येत. पतीपत्नीच्या नात्याचंही असंच असतं बहुधा. नात्याचं पान पिकू लागले की त्याच्या देठातल हे कोवळपण हिरवं हळवेपण उलगडायला लागत हळू. हळू.. हळू...





श्री. विजय मनोरकर
९८५०५११६०५

## को रो ना
## कोई रोए ना
(तर्ज : कितना बदल गया इन्सान)

देख तेरे संसार की हालत क्या हो गई भगवान ।
सारा जग कोरोना से हैरान  सारा जग कोरोना से हैरान ।।

बंद पड गये सारे जग धंदे  रोजी रोटी के हो गये वांदे।
मजदूर सारे क्या करेंगे  क्या खायेंगे तेरे बंदे ।।
शहर के शहर खाली होगये गलियाँ होगई सुनसान,
सारा जग कोरोना से हैरान  सारा जग कोरोना से हैरान ।।१।।

जिनके दम पर उन्नती ये करेंगे  उन्हे ही डसते रहेंगे।
भाई भाई करते रहेंगे  कब सुधरेंगे अकल के अंधे।।
जूझ रही है मानवता और पनप रहे हैवान ।।
सारा जग कोरोना से हैरान  सारा जग कोरोना से हैरान ।।२।।


कोरोना से बचके रहना  तुम अकल के तारे न तोडना ।
पुलिस से तुम सहयोग करना उनके डंडोसे बचके रहना ।।
अपनी गलती से प्रशासन को मत करना परेशान ।।
सारा जग कोरोना से हैरान  सारा जग कोरोना से हैरान ।।३।।

इस आपदा से हम निपटेंगे  अपनी सुरक्षा हम ही करेंगे ।
बार बार हात हम धोयेंगे हम घरके अंदर ही रहेंगे ।।
ये आवाहन करते है देश के श्री.मोदी पंतप्रधान ।।
सारा जग कोरोना से हैरान  सारा जग कोरोना से हैरान ।।४।।

कोरोना पर विजय है पानी न रहे किसीकी मानवता से दुश्मनी ।।
जीयो और जीने दो की ये महावीर वाणी सारी दुनिया खुशहाल है करनी ।।
सारी दुनिया इक दिन मानेगी मेरा भारत देश महान ।।

न रहे कोरोना का नामोनिशान ।
न रहे कोरोना का नामोनिशान ।।
न रहे कोरोना का नामोनिशान ।।।





# पेंटिंग्ज

प्रसाद कामत
८३२१८६००५६





# युद्ध

श्री. विजय मनोरकर
९८५०५११६०५

[illegible]

# छोट्यांसाठी कविता



कै. सावित्री पवार
सौजन्य: प्रियांका घारगे
(मुलगी) ८८३०३२८५८५

ढग

मी एकदा बसले होते अंगणात
एवढ्यात जमले ढग गगनात
कसे वर्णन बरे त्याचे करावे
वाटत होते जावून धरावे
त्यांचा आकार होता वेगवेगळा
जणू आकाशात भरला ढगांचा मेळा
काही ढग होते काळेकुट्ट
काही होते राक्षसासारखे लठ्ठ
बसले होते त्यांचे निरीक्षण करत
एवढ्यात झाली एक मोठी गंमत
एकदम आला जोराचा वारा
ढगातून वाहू लागल्या पावसाच्या धारा

ए स्नेहाराणी माझी सोनी
का ग दिसतेस रुसल्यावानी
तुझ्यासवे खेळायला
आले बघ पक्षी सारे
संध्याराणी येईल तेव्हा
येतील हे चंद्रतारे
रुसवा उगा सोड बाई
नको काढू डोळा पाणी
ये गं ये गं चिऊताई
स्नेहाला माझ्या खेळायला नेई
ये गं ये गं काऊ
स्नेहाला देई खाऊ
ये गं ये गं परी राणी
स्नेहाला सांग गोड कहाणी

चिकन चिकन बाळ

हे चिकन चिकन बाळ माझं चिकन चिकन बाळ
याला खेळाया मी वाजविते टाळ
हे माझं मुल असं गुलाबाचं फूल
बघा कसे पायातले वाजविते चाळ
हातपाय हलवी साऱ्यांना बोलवी
याचा खेळ पहायला थांबेल हा कुळ
क्षणात हसे हे क्षणात रुसे आवडे मज
जरी हे असले खट्याळ






कु. वेदिका र. गोरे
इ. ६ वी (१३२५०४३०४१)
















सार्थक अं. शेजूळ
इ. ४ वी (८६००११३५८२)











सार्थक अं. शेजूळ
इ. ४ वी (८६००९९१५८२)



# आई

कु. अनुश्का अ. जाधव
९७६५६३०९४२

दु:खाच्या प्रसंगी हळुवारपणे दिलासा देणारी,
चिऊ-काऊचा घास भरवूनी, शिवरायाच्या कथा संगणारी
नैराश्याच्या प्रसंगी,पााठीवर हात फिरवणारी,
संसाररूपी निखाऱ्यावर फुंकर घालून,
वेळो वेळी झाशीची राणी होणारी
अशी फक्त आईच असते..



कु. श्रुती चं. शेजूळ
इ. ७ वी (९२८४६३७८७१)



कु. स्वराली चं. शेजूळ
इ. ३ री (९२८४६३७८७१)











आरती इरकर
इ. ७ वी (१७६५०२७८११)










वैष्णवी इरकर
इ. ३ री (१७६५०२७८११)







कु. सृष्टी अं. शेजूळ
इ. १० वी (८६००११११५८२)







# पेंटिंग्ज

आदित्य कांबळे
इ. ६ वी
८८५७०२०११२



प्रियांका घारगे
८८३०३२८५८५









## बाग

मी एकदा गेले होते बागेत
तेथे मुले खेळत होती मजेत
बागेत फुलली होती सुंदर फुले
तिथे होती सुंदर गोजिरी मुले
फुले फुलली होती जास्वंदी मोगरा
सुटला होता सुगंधी हळुवार वारा
वाऱ्याने येवू लागला फुलांचा सुगंध
त्या सुंदर सुगंधाने झाले मी मुग्ध



कु. सृष्टी अं. शेजूळ
(८६००११३५८२)

# केक










# मी पाहिलेला महापूर


कु. अनुश्का अ. जाधव
१७६५६३०१४२


इकडे पाणी तिकडे पाणी सगळीकडे नुसतं पाणी आणि त्या पाण्यात अडकलेली लहान लहान मुले, वयस्कर माणसे जनावरे आणि या सर्वांना वाचवण्यासाठी जीवाची पर्वा न करणारे NDRF चे जवान व आपली माणसे . हे सर्व आठवल्यावर अंगावर सरकन काटा येतो.


२६ जुलै २०११. २६ जुलै, सर्वाच्या आठवणीत राहणारा दिवस. ज्या दिवशी अख्खा महाराष्ट्र हादरला. सर्व नदयांनी एकत्रपणे अचानक आपले रौद्र रूप धारण केले. सगळीकडे गोंधळ उडाला, सगळे लोक इकडे तिकडे पळू लागले एकच आवाज पूर आला. पूर आला.. सर्व नदयानी रौद्र रूप तर धारण केले पण त्यामध्ये लहान मुलांना, वयस्कर व्यक्तींना एवढच काय तर जनावरांना सुध्दा सोडले नाही.

सर्व वेदना आपली सांगली सुध्दा सहन करत होती. या धरणी मातेच्या कुशीत अवतरलेली कृष्णामाईने सुध्दा आपले रौद्र रूप धारण केले होते. अख्या सांगलीला हैरान करून सोडले. जनजीवन विस्कळीत झालं होतं. त्यामध्ये आडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे काम NDRF चे जवान करत होते. महापूरने सगळयांचं आयुष्य विस्कळीत करून ठेवलं. आपल्या सांगली जिल्यातील नरसेबाची वाडी, औदुंबर देवस्थाने पाण्याखाली होती. लहान मोठया गावामध्ये पाणी शिरले होते असं वाटत होते की गावात नदी की नदीत गाव हे काहीच समजत नव्हते.आपाल्या सांगलीत एवढं होतं.

आपली सांगली समुद्रात वसली आहे की काय ? जवळ जवळ इमारतीच्या पहिल्या ते दुसऱ्या मजल्या पर्यत पाणी गेले होते.या महापुराने लहान मोठया मुलांच्या अब्यासाचे बाजारपेठेतील कपडे, स्टेशनरी सवे साहित्य असे सवे काही सोबत घेऊन गेला.लेकांनी पै पै जमा करून आपले आयुष्य सुधारले असताना अचानक महापूराने एका क्षणात पाण्याखाली गेले.

जिल्यातील ब्रम्हनाळ सारख्या एका छोटया गावात पूराचे पाणी शिरले. काही कारणास्तव ण्ड्रप चे जवान तेथे पोहचू शकले नाहीत,पण लेकांना वाचवण्यासाठी गावातील लोकांनी एका खाजगी बोटीने मदत केली. त्या बोटीमध्ये बसलेल्या लोकांना काहीच कल्पना नव्हती. अचानक सगळीकडे आरडा ओरडा चालू होता. बोटीत बसलेली सर्वजण आपला जीव मुठीत धरून बसले होते. हळू हळू बोट सरकू लागली, पाणी जोर वाढतच होते अचानक बोट हलू लागली आणि बघतोय तर काय पापणी लवताच क्षणी बोट दिसेनाशी झाली. खाली बघतोय तर काय उलटी झाली. १७ ते १८ लोक मृत्यूमुखी पडले. एक आई आपला आपल्या बाळाचा जीव मुठीत धरून बसली होती .आईने बाळाला मिठी मारली आणि त्या आईने शेवटच्या श्वासा पर्यत बाळाला सोडले नाही.एका क्षणात सर्व काही संपले. ज्यावेळी डॉक्टरांचे रूग्णावरील उपचार थांबतात, तेव्हा डॉक्टर सुध्दा म्हणतात आता देवाच्या हाती सर्वकाही.

अशा प्रकारे,
जिंदगी गुजर एक मकान बनाने में,
और कुदरत भी उफ्फ तक नही करती बस्तियाँगिराने में
ना उजाड ए खुदा किसी के आशियाने को ,
पाई कमाकर वक्त बहुत जाता है ,
एक छोटा-सा घर बनाने को..! !
असा होता २०११ चा मी पाहिलेला महापूर. हा महापूर सांगली, कोल्हापूर, सातारा या हा महापूर मी कधीच विसणार नाही.
धन्यवाद







# यशस्वी भव

गीतांजली भोसले
७२१८८५११०२



घडवू स्वत:स मिळवू आदर, करूया संकल्प सिद्धतेचा
ना कोणा दाखवण्या, ना कुठे मिरवण्या
स्वत:ला सिद्ध करू, आत्मसन्मान मिळवण्या ।। १ ।।
पहिली पायरी आत्मविश्वासाची, दुसरी पायरी निर्णयक्षमतेची,
नसे थारा परावलंबनास, दुसऱ्याला काय वाटे हे जाणण्यास ।। २ ।।
घे निर्णय खंबीरपणे ठाम रहा त्यावर, कर एकदाच विचार निर्णय घेण्याअगोदर
फार काय होईल तू चुकशील अनेकदा
अपयश येईल, तू पडशील अनेकदा,
ते ही असे महत्वाचे, आयुष्य भरले ऊन-सावलीचे
ठेव विश्वास स्वत:वर, गाठशील शिखर यशाचे ।। ३ ।।
तिसरी पायरी असे ज्ञानार्जनाची, संपूर्ण ज्ञानप्राप्तीची
ज्ञान हे ज्ञान आहे, इथे नको कुचराई
खेळ सारा व्यर्थ आहे अज्ञानाने ग बाई ।। ४ ।।
चौथी पायरी असे अथक परिश्रमाची, सातत्याची अन ध्यासाची,
पाचवी पायरी तुझ्या पावलांसोबत अनेक पावले जोडण्याची
छोट्या छोट्या अनेक वाटा, मिळून होईल एक हमरस्ता
एकत्र येणे, हाच मार्ग सर्वोत्तम यशाचा ।। ५ ।।
दे झुगारून सर्व बंधने, स्त्रीपणाची सर्व लक्तरे,
आव्हानांना तू जा सामोरी, नको फिरूस माघारी,
कर संकल्प घडव स्वत:स
यशस्वी भव ! यशस्वी भव !! यशस्वी भव !!!



# QUICKSILVER IT SERVICES, KUPWAD.

# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

दिवाळीनिमित्त स्मृती हा दिवाळी अंक आम्ही पहिल्यांदाच घेऊन येत आहोत

लहानांपासून मोठ्यापर्यंत आपल्या सर्वांसाठी

## स्मृती मासिक दिवाळी विशेषांक

मासिक अंकासाठी कथा, लेख, कविता, विनोद, शब्दकोडे, रंगवण्यासाठी चित्र,
नवीन कार्टून्स, तसेच लहान मुलांचे चित्र, वैज्ञानिक प्रयोग व मोडेल्स स्वीकारले जातील.

पुस्तक, मासिक, प्रोजेक्टचे टायपिंग, डिझाईनिंग केले जाईल.

## कॉम्प्युटर ट्रेनिंग

अकॅडेमिक क्लासेस १ ली ते ७ वी सर्व विषय
८ वी ते १० वी (इंग्लिश, गणित, विज्ञान)
मराठी सेमी व इंग्रजी माध्यम
(स्टेट बोर्ड, आय.सी.एस.इ., सी.बीएस.सी बोर्ड)



नेट कॅफे, ऑनलाईन / ऑफलाईन
डेटा एन्ट्री ची कामे घेतली जातील.

संपर्क: क्विकसिल्वर आयटी सर्विसेस
साई सोसायटी, विजयनगर-कुपवाड रोड, चाणक्य हॉटेल चौक जवळ,
चंद्रकांत ऑटो गॅरेज शेजारी, कुपवाड.
मोबा. नं. ७२१८८५११०२
इमेल आयडी: quicksilver016gmail.com